Creass (TRBC) is given in Table I. DRBC ;in predominant in both hands in either sexes, but is more prominent in male right hands. SRBC and TRBC is more common in left hands in both sexes. Although, alll three types are not found exactly in euqal frequencies in right and left hands, yet the bimanual differences are not statistically significant. Sex differences among the Dhankuttas are highly significant (X^2 =11.99, 2df p 0.01) as is also observed in prevbious studies (Chaube, 1979).

The finer classification of the principal types based upon the initial bifurcation of split of transverse crease is igven in Table 2. S_4 and D_4 subtypes of SRBC and DRBC respectively are most common in both sexes. S5 is absent in both sezes. S_3 is common in males and S_2 in females. D_4 subtype of DRBC is dominant in either sex followed by D_5 in males and D_6 in females. D_1, D_2, D_3 subtypes were very rare. No subtypes of TRBC were encountered in the present study.

CONCLUSION

The comparison with other North Indian populations shows that Dhankuttas have a predominance of DRBC and alight decrease of SRBC and TRBC types. Dhankuttas males differ significantly from Bhangi males)P <0.01) and Dhankuttas females from Brahmins (P < 0.001) and Punjabis (P 0.001). Combined Dhankutta population sample differs significantly from Brahmins (P < 0.001) and Bhangis)P < 0.01) Punjabis (P < 0.001) and Patials Punjabis (P.< 0.001) (Chaube, 1977, Sidhu et al. 1985). These differences are in line with differences observed in serogenetic and morphometirc attributes (Mastana, 1987) and refelect upon diverse origins of these populations. But owing to paucity of avialble published data on Northern Indian and related populations, no pragmatic picture can be drawn, and this warrants further studies to understand the ethnoc variation of this trait among different populations.

REFERENCES

1) Bali, R.S. 1983. Creases in forensic and criminological investigation. In:Anthropology in Indian Context, ed by I.J.S. Bansel, PP. 187-194, Delhi, Today tomorrow's Printers and Publishers.

2) Choube, R., 1979. Palmar creases as a morphological variable. Ind. J.Phys. Anthrop. and Hum. Genet., 5: 123-136.

(P.T.O. for tables)

Table 1

Bimanual and bisexual distribution of Palmar Flexion Creases among the Dhankuttas

Type	Males						Females					
	Right		Left		R + L		Right		Left		R + L	
	No.	%	No.	%	No.	%	No.	%	No.	%	No.	%
SRBS	6	5.00	9	7.50	15	6.25	11	8.80	14	11.20	25	10.00
DRBC	108	90.00	104	86.67	212	88.33	99	79.20	93	74.44	192	76.80
TRBC	6	5.00	7	5.83	13	5.42	15	12.00	18	14.44	33	13.20

Bimanual differences

Males Chi-square 0.74, P N.S.

Females Chi-square 0.82, P N.S.

Sex differences Chi-square 11.99, 2df, P<0.01

Table 2

Frequency distribution of sub types of Palmar Flexion Creases among the Dhankuttas

Type	Males						Females					
	Right		Left		R + L		Right		Left		R + L	
	No.	%	No.	%	No.	%	No.	%	No.	%	No.	%
SRBS	6	5.00	9	7.50	15	6.25	11	8.80	14	11.20	25	10.00
S_1	1	0.83	2	1.67	3	1.25	2	1.60	2	1.60	4	1.60
S_2	-	-	-	-	-	-	3	2.40	4	3.20	7	2.80
S_3	2	1.67	3	2.50	5	2.08	1	0.80	1	0.80	2	0.80
S_4	3	2.50	4	3.33	7	2.92	5	4.00	7	5.60	12	4.80
S_5	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
DRBC												
D_1	1	0.83	1	0.83	2	0.83	-	-	-	-	-	-
D_2	3	2.50	2	1.67	5	2.08	1	0.80	-	-	-	0.40
D_3	3	2.50	4	3.33	7	2.92	2	1.60	1	0.80	3	1.20
D_4	79	65.83	81	67.50	160	66.67	80	64.00	83	66.40	163	65.20
D_5	16	13.33	12	10.00	28	11.67	5	4.00	4	3.20	9	3.60
D_6	6	5.00	4	3.33	10	4.17	11	8.80	5	4.00	16	6.40
TRBC	6	5.00	7	5.83	13	5.42	15	12.00	18	14.40	33	13.20

आदिवासींच्या परंपरा चालीरिती व धार्मिक कल्पना

* श्री.आर.डी.खरोसेकर

महाराष्ट्रात एकूण (४८)अनुसूचित जमाती आहेत. यात प्रामुख्याने आंध, भिल्ल, गोंड, कोरकू, कातकरी, कोलाम, वारली, ठाकूर, महादेवकोळी इ.जमाती मोडतात. आजच्या विज्ञान व आधुनिक युगात आपण वावरत असलो तरी आदिवासींची अजूनही म्हणावी तशी प्रगती झालेली दिसून येत नाही. यामागची कारणे अनेक आहेत. त्यापैकी मुख्य कारण हे साक्षरतेचे आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण १९९१ च्या जनगणनेनुसार ३७.७७ टक्के इतके आहे. यात प्रामुख्याने त्यांच्या पारंपारिक समजूती, अंधश्रध्दा इ.गोष्टींचाही समावेश होतो.

मानव आपले आस्तित्व टिकविण्यासाठी, स्वत:चा विकास साधण्यासाठी भोवतालच्या परिस्थितीचा, निसर्गाचा योग्य तो उपयोग करुन घेऊन स्वत:ची प्रगती साधत असतो. त्यासाठी तो निसर्गावर सातत्याने मात करण्याचा प्रयत्न करीत आला आहे. मानवाची निसर्गावर मात करण्याची अखंड धडपड चालू आहे. परंतू ही गोष्ट साध्य करणे अजूनपर्यंत तरी मानवास शक्य झालेले नाही. निसर्गावर मात करण्याच्या त्याच्या या घटनांमुळे त्याला अनैसर्गिक अशा संकटांना सामोरे जावे लागते. उदा.भूकंप, दुष्काळ, पूर, वादळे, अतिवृष्टी, रोगराई इ.संकटांना सामोरे जाण्यासाठी किंवा सुरक्षित जगण्यासाठी त्याला पुन्हा निसर्गावरच अवलंबून राहावे लागते व तो त्याची एका भावनिकक्षणी पूजा करु लागतो. याच ठिकाणी/याच प्रयत्नांमधून धर्माची निर्मिती झाली व त्यातूनच वेगवेगळ्या चालीरिती, परंपरा, रुढी उदयास आल्या असाव्यात, असे वाटते.

अलौकीक शक्तीवरील दृढ विश्वास व धर्माचा पाया असून हीच कल्पना सर्व समाजामध्ये दृढ झालेली आहे. आदिवासींचे संपूर्ण जीवन निसर्गाशी निगडीत असते.

* संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे४११ ००१

त्यामुळे त्यांचा धर्म, देव, गुरु इ.निसर्गातील असल्याचे काही ठळक गोष्टीवरुन स्पष्ट होते. उदा.वाघोबा देव, धान्याची पूजा करणे, नारनदेव इ.यात पशु, पक्षी, झाडे, धान्य इ.निसर्गातील घटकांची पूजा करताना आदिम जमाती आढळून येतात.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या चालीरिती, धार्मिक कल्पना, रितीरिवाज व उपासना पध्दती भिन्न भिन्न प्रकारच्या आहेत. आदिवासींच्या धार्मिक रुढी निसर्ग पूजेतून निर्माण झालेल्या आहेत. जे जे निसर्गात गूढ ते ते सर्व पूजनीय अशी त्यांची भावना असते. आकाश, आकाशात चमकणारी वीज, सूर्य, चंद्र, तारे,ढग, प्रचंड झाडे, वाघ, सिंह,साप, विंचू अशा नैसर्गिक गोष्टींची आदिवासी जमातीमध्ये पूजा करतात. त्यांच्यामध्ये हिरवा, चित्ता, हिमाई, डोंगरदेव, गांवदेव, कणसरी, धरतरी इ.देवदेवता असल्याचे दिसून येते. ते आपल्या पितरांनाही देव मानतात. मृतात्मेदेखील त्यांना देवासारखेच वाटतात. त्यांना ते चेडा, सुपली, वीर इ.नांवाने ओळखतात. मन्नादेवी, महालक्ष्मी, चामुंडा, महादेव, नारायणदेव, भैराबा, खंडोबा, मारुती इ.हिंदू देवांचीही काही आदिवासी जमातीत पूजा करतात.

आदिवासी मूलतःच भित्र्या स्वाभावाचे, गरीबवृत्तीचे असल्याचे दिसून येतात. त्यांचा भूताखेतावर, पिश्चांवर विश्वास असतो. त्यांच्या कोपामुळे रोगराई, संकटे निर्माण होतात, असा त्यांचा समज आहे. ते आपल्या पितरांना देव मानतात. अतृप्त आत्म्यांनी आपल्याला त्रास देऊ नये म्हणून ते पितरांची पूजा करतात. त्यांच्या पितराचे देव लाकडांच्या ओंडक्यावर/दगडावर कोरुन गांवाच्या बाहेर वेशीजवळ उभे केलेले असतात.

आदिवासींच्या जीवनात 'भगत' ही एक धार्मिक संस्था असून तो त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. मुलांना दुखणे आले भगताकडे जा, गाई-गुरे, कोंबड्या इ.पाळीव जनावरांना रोगराई झाली, भगताकडे जावून त्यावर उपाय करतात. त्यांचा भगतावर पूर्ण विश्वास असतो. भगताला दैवीशक्ती प्राप्त असते. त्याला गूढ गोष्टीचा अर्थ समजतो, तो भविष्य वर्तवू शकतो, अशी त्यांची समजूत असते. परंतू भगताला ताडीमाडी, कोंबडी व पैसा दिल्याशिवाय तो काही सांगत नाही, हेही तितकेच खरे आहे. अलिकडच्या काळात काही आदिवासी शिक्षित झाल्यामुळे त्यांचा भगताकडे असलेला दृष्टीकोन बदलत असून ते

आजारपणात वैद्यकीय मदत घेऊ लागलेले आहेत. भगताला वनौषधीची, झाडपाल्याची माहिती असल्याचेही बऱ्याच जमातीमध्ये आढळून येते. त्यामुळे साध्या साध्या उपचारांवर हे लोक बरेही होतात, असे दिसते. मूलतः आदिवासी डोंगरदऱ्याच्या भागात राहत असल्याने त्यांना होणारे रोग हे कुपोषणामुळे होत असल्याचे दिसून येत आहेत. विशेषतः स्त्रियांमध्ये व मुलांमध्ये हे प्रमाण जास्त आढळून येते. याला अनेक कारणे आहेत. पहिले व मुख्य कारण म्हणजे पौष्टिक व भरपूर आहाराची कमतरता , जंगलात मिळणारी कंदमुळे व फळे, तसेच काही प्राण्यांची शिकार करुन ते त्यांचा उदरनिर्वाह करतात. शेती फारशी नसल्याने व वेठबिगारी हाच त्यांचा परंपरेने चालत आलेला उद्योग असल्याने त्यांना स्वतःला स्वतःच्या कुटुंबापुरते पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने कुपोषण होऊन मृत्यु ओढवत असल्याचे दिसून येते.

आदिवासींच्या जीवनात दारुला विशेष महत्व आहे. जन्मल्यापासून पुढे बारसे, लग्न, मृत्यु, पंचायत सभा, पाहुण्यांचा सत्कार, सण, जत्रा इ.विशेष प्रसंगाच्या निमित्ताने एकत्र येणे झाले की, दारुचा पाहुणचार होतो. काही जमातीत तर मूल जन्माला आले की, त्याच्या तोंडात दारुचा थेंब टाकला जातो. तसेच मनुष्य मेल्यावरही त्याच्या तोंडात दारु घातली जाते. इतके महत्वाचे स्थान दारुचे आदिवासींच्या जीवनात असल्याचे दिसून येते. दारु पिणे हे पाप आहे,ते समाजस्वास्थ्याला विघातक आहे हे मूलतःच आदिवासी समाज जीवनाला मान्य नाही. इतके दारुचे नि आदिवासींचे अतूट असे नाते आहे. आदिवासींमध्ये स्त्री, पुरुष, मुले सर्व लहानथोर दारु पितात. त्यांच्यात लहान मोठा हा भेदभाव दारु पिताना आढळून येत नाही. 'होरी''अंबील' 'होडिया' असे दारुचे अनेक प्रकार त्यांच्यात प्रचलित आहेत. मोहांच्या फुलांची दारु सर्वत्र घेताना दिसून येते.

ज्याप्रमाणे दारुला आदिवासीमध्ये स्थान आहे, तसेच स्थान नृत्य व गाण्यांच्या बाबतीत आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, असे वाटते.

महाराष्ट्रातीलच नव्हें तर भारतातील सर्व आदिवासी जमातीच्या संस्कृतीतील एक विशेष बाब म्हणून नृत्य/गाणी यांची आवड जन्मल्यापासून मरेपर्यंत प्रत्येक आदिवासी स्त्री/पुरुष यांच्यात निसर्गतःच असते. आदिवासीमध्ये लहानथोर नृत्य करताना दिसून

येतात व यावेळी ते आपली भावना गाण्यांच्या रुपाने प्रकट करतात. निरनिराळ्या धार्मिक विधीच्या वेळी सण समारंभात, शेती व्यवसायाच्या भिन्न हंगामात, सामाजिक समारंभाच्या वेळी वेगवेगळी गाणी गाऊन वाद्ये वाजवून नृत्ये केली जातात व अशारितीने ते आपली करमणूक करुन घेतात. उन्हातान्हातून राबणारे, कधी खायला आहे तर कधी नाही, असे जंगलातील खडतर आयुष्य जगत असताना नृत्य गाण्यांच्या माध्यमातून ते त्यांची सर्व दुःखे विसरुन जातात. एकमेकांच्या हातात हात घालून, ढोलक्याच्या तालावर लयबध्दतेत नाचताना व गाणी म्हणताना हे आदिवासी भोवतालच्या निसर्गाशी एकरुप होत असताना दिसून येतात.

आदिवासींच्या अनेक जमाती असून त्यांच्यात नृत्यांचेही अनेक प्रकार असून ते वेगवेगळ्या प्रसंगानुसार वेळोवेळी नृत्ये करतात. त्यांची ही नृत्ये परंपरागत आहेत. ही नृत्ये त्यांना कोणी शिकवित नाहीत. त्यांना जसे सुचते तसे ते नाचत जातात. या नाचण्यात ही एक प्रकारची लय असते. जसे नाचाच्या बाबतीत तसेच गाण्याच्या बाबतीतही म्हणता येईल. त्यांना जसे सुचत जाते तसे ते गात जातात. त्यांच्या गाण्यातही एक प्रकारची गेयता असते. परंतू आदिवासी जरी निरक्षर असले तरी निसर्ग हा त्यांचा मोठा शिक्षक असल्याने त्यांना निसर्गतःच अशी गाणी सुचली जातात. ही गाणी कुठेही लिहिलेली नसल्याने परंपरेने मुखोदगत केलेली आहेत. परंपरेने पाठ होत आलेली ही गीते व्याकरण, वृत्त यांच्या दृष्टीने जरी ओबडधोबड असली तरी त्यात आदिवासी जीवनाचे वास्तव प्रतिबिंब असल्याचे दिसून येते व त्यामुळे ती हृद्य वाटतात. परंपरागत चालत आलेल्या गाण्यांव्यतिरिक्त सुध्दा काही प्रासंगिक गाणी आदिवासी तरुण त्या त्या वेळी रचतात व म्हणतात.

आदिवासी नृत्यांचे निरनिराळ्या प्रसंगासाठी निरनिराळे प्रकार आहेत आणि यावेळी त्यांची वाद्ये पण निरनिराळी असतात, असे दिसून येते. दिवाळी, होळी, अशा सारखे सण, लग्नसमारंभ, सुगीचा हंगाम संपला की या नृत्यांना अगदी बहर आलेला दिसून येतो.

आदिवासी जमातीत असलेल्या विविध नृत्यांचे प्रकार खालीलप्रमाणे आढळून येतात.

१.	कांबडनाच	वारली जमात
२.	तारपा नाच	वारली जमात
३.	शिमग्यांचा नाच	वारली जमात
४.	ठाकऱ्या नाच	कोकणा जमात
५.	ढोल नाच	ठाकर जमात
६.	होळी नृत्य	कोरकू जमात
७.	दंडारनृत्य	गोंड जमात
८.	डिंडण नृत्य	भिल्ल जमात
९.	बोहाडा नृत्य	महादेव कोळी

आदिवासींच्या जीवनात दारु व नृत्य याला जन्म व मृत्यु, सुख व दुःख अशा कोणत्याही प्रसंगी महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. आदिवासी लोकगीतातून मुलाचा जन्म झाल्यावर आनंदाने नृत्ये केली जातात. लग्नविधीत तर नृत्याला महत्वाचे स्थान आहे. जसे हिंदु धर्मात वेगवेगळे विधी लग्नाच्या वेळी केले जातात, त्याच पध्दतीने आदिवासींमध्येही हिंदू धर्माचा पगडा असलेला दिसून येतो. कारण कित्येक वर्षापासूनच त्यांचा हिंदू समाजाशी संपर्क आलेला आहे. त्यामुळे त्यांचे धार्मिक विधी, परंपरा, चालीरिती इ.हिंदू सारख्या असल्याचे दिसून येतात.

त्यांच्या नृत्यातून, लोकगीतातून, त्यांच्या जीवनातील सामाजिक मूल्ये, त्यांच्या विचारधारा यांचे दर्शन घडते. तसेच विविध प्रकारच्या लोकगीतांतून त्या त्या प्रसंगाची वर्णने करताना प्रामुख्याने शृंगाररसाचा, प्रणयांचा परिपोष झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर मानपान, रुसणे-फुगणे, देणे-घेणे, आनंद-दुःख, कोपरखळ्या, पती-पत्नीला उपदेश इ.घटकांचा ही उल्लेख केलेला दिसून येतो.

वेगवेगळ्या नृत्यप्रकारात वेगवेगळी वाद्य वाजवली जाताना दिसून येतात. तारपा नृत्य करताना तारपा वाजवितात. ढोल नाचाच्या वेळी ढोलाच्या तालावर नृत्य केले जाते. तर डफ व पावे ही कोलामांची विशेष वाद्य आहेत. दंडारी नृत्यात कोलाम दंडधारी (दंडारी) नृत्य करतात यात दंड घेऊन नृत्य केले जाते. बोहाडा नृत्यात विविध प्रकारच्या देवदेवता, प्राण्यांचे मुखवटे

घालूनच नृत्य सादर केले जातात. यात धार्मिकतेला धरुनच नाचगाणी होतात.

आदिवासी जीवनात जितके सण तितकेच नाच आणि तितकीच विविध गाणी त्यांच्या सांस्कृतिक जीवनाच्या, मूल्यांच्या कल्पना नागरी जीवनापेक्षा भिन्न आहेत. त्यांच्या नाचगाण्यातही मद्यपानाला महत्वपूर्ण स्थान आहे. नृत्याच्या वेळी सर्वजण मद्यपान करतात. त्यामुळे नाचणाऱ्यांना नवा हुरुप येतो.

आदिवासी नृत्ये हे त्यांचे वैशिष्टय असल्याचे वरील विवेचनावरुन दिसून येते. त्यांच्या नृत्यात धार्मिक भावना दडलेल्या असतात. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी नृत्ये नाचून ते आपली भावना प्रकट करतात. विशेषतः पावसाळा संपून धान्य हाती येण्याच्या सुमारास त्यांच्या नाचांना प्रारंभ होतो. गांव दिवाळीपर्यंत असे नाच चालतात. त्यांची वाद्ये नैसर्गिकच म्हणजे दुधी भोपळ्याची, लाकडी, कातड्यांची व तंतूची असतात. घुंगराचाही वापर नृत्यासाठी केला जातो. त्यांचे कालमान व ऋतु नाचासाठी ठरलेले असतात. ज्या प्रसंगाचा नाच त्याचप्रसंगी नाचला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असतो. आदिवासींना त्यांच्या नृत्यासाठी प्रेक्षकांची आवश्यकता नसते. ठरल्यावेळी विशिष्ट ठिकाणी वाद्यांचा नाद येऊ लागला की, आदिवासी तरुण-तरुणींचे पाय त्या रोखाने सहजासहजी चालू लागतात. एकदा नाच चालू झाला की तो तहानभूक विसरतो व त्याला रात्र कधी संपते हेही समजत नाही.

अशाप्रकारे आदिवासींमध्ये अनेक चालीरिती असून ते बहुतांशी हिंदू धर्माप्रमाणे देवदेवता पूजताना आढळतात. त्यांचा हिंदु धर्माशी जवळचा संबंध असल्याचेच यावरुन दिसून येते.

संदर्भ-

१. *महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न-* *श्री.सुधीर फडके*

२. *आदिवासी लोकगीते* *डॉ.जी.एम.गारे, श्री.सुधीर जोग*

३. *भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती* *डॉ.जी.एम.गारे*

कळवण प्रकल्प - भौगोलिक भिन्नता व आदिवासींची आर्थिक स्थिती यावर उहापोह - आवश्यक गरज

* श्री.रा.बा.मोकाशे

१३ सप्टेंबर, १९८९ ला कळवण प्रकल्पात आदिवासी विकास अधिकारी म्हणून हजर झालो तद्नंतर प्रकल्प अधिकारी म्हणून ३०/११/१९९३ पर्यंत काम केले. एकुण चार वर्षे कळवण प्रकल्पात काम करण्याची संधी मिळाली - ध्येय व ध्यास आदिवासींच्या शैक्षणिक विकासाचा होता तसेच आर्थिक विकासाच्या योजना राबविण्याचा होता. सदर प्रकल्पात काम करताना विविध अनुभव आले व आदिवासींचे जीवनास जवळून पाहण्याचा योग आला.

कळवण प्रकल्प हा पाच तालुक्याचा - कळवण, बागलाण, सुरगाणा, चांदवड, मालेगांव हे तालुके अंतर्भुत आहेत. तसे पाहिले तर कळवण व सुरगाणा तालुके पूर्ण आदिवासी तालुके तर बागलाणचा पश्चिम भाग ६२ गावे आदिवासी उपयोजनेत मोडतात. तीन तालुके हे सह्याद्रीचे कुशीत वसलेले पण भौगोलिक भिन्नता स्वतंत्र आहे व हवामान/पाऊस यात फारसा फरक नसला तरी पीक पध्दती मात्र भिन्न भिन्न दिसून येते. कळवण तालुक्यात मुख्यत्वे कोकणा समाजाची वस्ती आहे. बागलाणमध्ये कोकणा व भिल्ल समाज आहे तर सुरगाणा तालुक्यात कोकणा समाज दिसून येतो. तीन तालुक्यांची आर्थिक स्थितीची तुलना केली तर भिन्न आहे. कळवण तालुक्यात आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याचे महत्व कळल्यामुळे व साधनाची उपलब्धता असल्यामुळे आर्थिक स्थिती इतर तालुक्यांचे मानाने बरी आहे. त्यामुळे त्यांच्या शेती पद्धतीत पारंपारिक व सुधारित शेती पध्दती दिसुन येते. पाण्याचा पुरेपुर वापर करुन घेण्याची कला विकसित केल्यामुळे व खात्याने दिलेल्या वीजपंप व तेलपंप व न्युक्लिअस बजेट योजने अंतर्गत पी.व्ही.सी. पाईप पुरवठा या योजनांमुळे त्यांच्या शेतीमध्ये गह/मका या पीकांबरोबरच

* उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

भाजीपाला उत्पादन करणे, कांदा पीक घेतले जाते. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारत आहे. कळवण तालुक्यात आदिवासींचे नेतृत्व हे कुशल/धूर्त व विकासाचा ध्यास घेतलेले असल्याने इतर तालुक्यांचे तुलनेत निश्चित झेप घेणारे आहे हे मान्य करावे लागेल. याशिवाय या तालुक्यात रस्ते, पिण्याचे पाणी, लघुपाटबंधारे, पाटबंधारे योजनांची निश्चित अशी विकासकामे केल्यामुळे आदिवासी तालुका असूनही` शेती विकास व त्यास अनुकूल असे पशुधन विकास, कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय विकास वाढीस लागला आहे. या उपलबध साधनांचा उपयोग करुन घेऊन सर्वसामान्य जीवनमान सुधारले असून आर्थिक स्थिती सुधारण्याचे स्थितीत आहे. प्रकल्प कार्यालयाचा समन्वय व इतर खात्यांचे कार्यान्वियाने याचा मेळ योग्य रितीने राबविण्याची क्षमता स्थानिक नेतृत्वास पुर्णतः असल्यामुळे खऱ्या दृष्टीने तेथील विकास, विकसनशील मार्गाने चालू आहे असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. तालुक्यातील आदिवासी शेतकरी हा आपल्या शेतीमध्ये वस्ती करुन राहात असल्यामुळे त्याचा व त्यांचे कुटुंबातील प्रत्येक माणसाचा पुर्ण वेळ शेतीमध्ये जातो त्यामुळे त्यांचे शेतीचा विकास होण्यास मदत झाली आहे. उपलब्ध पशुधन बैल यांचे आधारे आदिवासी शेती करतो तर वीजपंप/तेलपंप यांचे सहाय्याने उपलब्ध पाण्याचा पुरेपुर फायदा घेणेसाठी तो प्रयत्न करतो. याशिवाय कळवण तालुक्याचे पश्चिम भागात जे आदिवासी शेतकरी १० एकर किंवा त्यापेक्षा अधिक जमीनधारक आहेत त्यांची शेती ही सुधारक पध्दतीने बागायती पिकांची व ज्या पिकांमधून शेतकऱ्यास जास्तीत जास्त नफा मिळणे शक्य आहे उदा.ऊस, द्राक्षे, कांदा, सुधारीत भाजीपाला इत्यादी पिके घेण्यात अग्रेसर आहे.

विहीरी, नदी, नाले यांना पाटबंधारे प्रकल्पाचे योजनांमुळे पाण्याचा स्त्रोत उपलब्ध झाल्यामुळे व धरण चनकापूर/धनोली व अन्य लहानमोठे प्रकल्प विकसित होत असल्यामुळे निश्चितपणे पाण्याची उपलब्धता वाढीस लागली आहे. त्यामुळे या भागात सुधारीत शेतीने विकास होत आहे. यामध्ये शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान व रासायनिक खताची मात्रा यांचे प्रशिक्षण दिल्यास तसेच सेंद्रिय व जैविक खते वापरून शेतीचा दर्जा सुधारण्याचे सूत्र विकसित

केल्यास कळवण तालुक्यातील आदिवासी शेतकरी आधुनिक शेतीच्या विकासात गरुडझेप घेईल यात शंका नसावी.

परंतु यासाठी शेती खाते, पाटबंधारे, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचा योग्य समन्वय ठेऊन शेतकऱ्याचे वेळोवेळी प्रशिक्षण/चर्चासत्र/बाजाराची उपलब्धता याचा अभ्यास करुन नगदी पिकांचे नियोजन/पिक संवर्धन व उत्पादन वाढीचा कार्यक्रम राबविल्यास ते आदिवासी जनतेच्या हिताचे ठरेल. यासाठी अजूनही या भागात लहानमोठ्या उपसा जलसिंचन योजना राबविल्यास बरेचसे क्षेत्र ओलीताखाली येऊ शकते व त्या आधारे त्यांचा विकास करणे सहज शक्य होऊ शकेल.

सुरगाणा तालुका

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला व गुजरात राज्याला जवळ असलेला हा तालुका असून मुख्यतः कोकणा हा आदिवासी समाज तेथे राहतो. नार व पार च्या खोऱ्यात असलेल्या गावामधून तर पुर्व सुरगाणा तालुका हा चिराई च्या माळ माथ्यावर उपलब्ध गावातून वस्तीमधून आढळतो. पावसाळ्यात अति पाऊस म्हणजे सरासरी १००० मिली पेक्षा अधिक पाऊस पडतो. पण उन्हाळ्यात पिण्याचे पाण्यासाठी महिलांना उपलब्ध झऱ्यावरुन, विहीरीवरुन पाणी आणावे लागते. गाव व पाडा यांचे सर्वेक्षण करुन उपलब्ध पाण्याचा स्त्रोत पाहून लहान योजना त्या त्या गाव व पाडा यांचेसाठी राबविल्यास बराच प्रश्न सुटू शकतो व अशा लहान पाणी पुरवठा योजनामुळे बऱ्याचअंशी प्रश्न सुटलेला आहे.

शेतीसाठी पुरेसा पाऊस पडूनही डोंगराळ भाग असल्यामुळे व शेतीला पाणी पुरवठा योजना मोठ्या प्रमाणात व पुरेशा उपलब्ध न होवू शकल्यामुळे हा तालुका सिंचनापासून वंचित राहिलेला आहे व पुरेसे सिंचन क्षेत्र उपलब्ध होणेस वाव असूनही उत्पन्नवाढीपासून व सुधारीत शेती पध्दती पासून वंचित राहिला आहे.

सुरगाणा तालुक्यात उंबरठाण/गुही या भागात जमीन प्रतवारी चांगली आहे. शेतकरी उपलब्ध वीजपंप/तेलपंप यांचा वापर करुन फक्त पावसाळी पिकांऐवजी म्हणजे भात, वरई/नागली याऐवजी गहू व भाजीपाला अथवा अन्य तत्सम अधिक उत्पन्न देणारी पिके घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु लहान शेतकऱ्यांना पाच ते सहा शेतकऱ्यांचा समूह एकत्रित करुन उपसा सिंचन योजना राबविल्यास त्यांची आर्थिक

स्थिती सुधारणेस मदत होईल. याशिवाय आदिवासी उपयोजनेअंतर्गत तरतुदीमधून जमीन सपाटीकरण/बांध बंदिस्ती व कोल्हापूर पध्दतीचे लहान बंधारे मोठ्या प्रमाणात बांधून ती योजना यशस्वीपणे राबविल्यास खऱ्या दृष्टीने आदिवासी भागाचा विशेषतः सुरगाणा तालुक्याचा विकास होणेस मदत होईल. सध्या तालुक्यात भात शेती मोठ्या प्रमाणात केली जाते परंतु ती पारंपारिक पध्दत आहे व सुधारित बी बियाणाची नसल्यामुळे शेती उत्पन्न जेमतेम चार ते सहा महिने पुरेल एवढे निघते. अन्य कालावधीत जीवन जगण्यासाठी त्यांना गुजरातमध्ये अथवा नाशिक जिल्हयाचे पूर्व भागात स्थलांतर करणेशिवाय गत्यंतर नाही करिता पुरेसा पाऊस व शेती उपलब्ध असून सुधारित शेती, पाण्याचा अभाव व योग्य नियोजनाअभावी कमी उत्पन्नावर गुजराण करावी लागत आहे. या तालुक्यात याशिवाय बांबूपासून हस्तकला, वनऔषधी उत्पादन, फलोत्पादन, विणकाम, भाजीपाला निर्मिती, दुभती जनावरे संगोपन या योजना प्रभावीपणे राबविल्यास निश्चितपणे आर्थिक स्थिती सुधारु शकेल.

बागलाण तालुका

बागलाण तालुका हा अंशतः आदिवासी तालुका आहे. तालुक्याचे पश्चिम भागात मुख्यत्वे कोकणा व काही गावामध्ये मिश्र लोकसंख्या भिल्ल समाजाची आढळते परंतु भिल्ल समाजाची स्वतंत्र अशी गावे नाहीत परंतु गावामध्ये मुख्य वस्तीचे शेजारी वाडा/पाडा पध्दतीने भिल्ल समाज आढळून येतो. बागलाण मधील कोकणा समाज हा मुख्यत्वे शेतीप्रधान व सुधारित शेती पध्दती कडे झुकला असून हरणबारी/तुताणी ही धरणे उपलब्ध झाल्यामुळे व जमीनीची प्रतवारी चांगली असल्यामुळे गहू, बाजरी, भाजीपाला, भुईमूग, भात, नागली, वरई ही पिके घेतात.

पाण्याचे महत्व शेतीसाठी कळल्यामुळे पारंपारिक पध्दत सोडून अधिक उत्पन्न देणारी पिके घेणेसाठी प्रयत्न करीत आहेत. बाजारपेठ दूर व भाव शाश्वत नसल्यामुळे सुधारित शेती करुनही त्यांची आर्थिक स्थिती जेमतेम बेताची आहे. या तालुक्यात हवामान थंड असून पश्चिम

भागात पाऊस भरपूर पडतो. शेतकऱ्यांना लहान उपसा व जमीन सपाटीकरण करुन पाणी उपलब्ध करुन दिल्यास आर्थिक स्थितीत भर पडेल. प्रकल्प कार्यालयाकडून अथवा आदिवासी उपयोजनेद्वारे दुभत्या गाई म्हशींचा पुरवठा झाल्यास हवामान, जमीन व पाणी पोषक असल्यामुळे निश्चित उत्पन्न वाढीमध्ये भरच पडेल. करिता कळवण प्रकल्पात तीन तालुके मुख्य आदिवासी उपयोजने अंतर्गत अंतर्भूत आहेत. कळवण सुरगाणा हे १००% आदिवासी उपयोजनेत मोडतात तर बागलाण हा अंशता येणारा तालुका आहे. तीन तालुक्याचे हवामान, भौगोलिक रचना, पाऊस प्रमाण, शेती करण्याच्या पध्दती, पीकेही भिन्न पध्दती आहेत व न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत एक योजना अन्य तालुक्यास लागू होणारी नाही. प्रत्येक तालुक्याने भौगोलिक भिन्नतेचे आपले अस्तित्व स्वतंत्र राखून ठेवलेले आहे.

करिता अन्य खात्यांशी समन्वय प्रभावी ठेवून उत्पन्न वाढीसाठी यशस्वी योजना उदा. दुभती जनावरे (म्हैस) पुरवठा, जमीन सपाटीकरण, लहान उपसा सिंचन योजना, मोफत विहीरी, वीजपंप, तेलपंप, भाजीपाला विकास, फलोत्पादन, सुधारीत खते या योजना फक्त उद्दिष्ट पूर्तीच्या न ठेवता मोठया प्रमाणात घेतल्यास निश्चितपणे आर्थिक विकास दिसून येईल असे मत आहे.

*****

इंदलचा उत्सव

* पावरा चुनिलाल एन

पावरा जमातीची संस्कृती खास वैशिष्टयपूर्ण अशी आहे. आदिवासी संस्कृतीतील त्यांच्या रूढी, परंपरा, सण, उत्सव आदि घटक यांच्या सभोवतालच्या पर्यावरणाशी निगडीत असे आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते निसर्ग पुत्रच आहेत. ऋतुबदलाप्रमाणे वनस्पतीचे बदलते रंग बदलत्या हंगामाप्रमाणे उत्सवाशी क्रमबध्द अशी सलग साखळी आढळते. मुख्यत्वे करून पावरा समाज इंदल, पोळा व होळी हे तीन उत्सव ते बदलल्या ऋ तुमानानुसार साजरे करीत असतात.

इंदल हा सण पावरा लोकांतील प्रसिध्द असा उत्सव आहे. होळी सणाच्या खालोखाल इंदल सणाला महत्वाचे स्थान असते. इंदल तीन प्रकारे साजरे करतात. एक सामुदायिक रित्या गावकरी मिळून साजरा करतात. त्याला 'गाव गोंदऱ्या इंदल' असे म्हणतात. दुसरा वैयक्तिक घरगुती साजरा करतात त्याला 'चुऱ्या इंदल' असे म्हणतात. किंवा खाजगी माताइंदल म्हणतात. तिसऱ्यास 'माता खुट जात्रा-सुरीन बादा' असे म्हणतात.

इंदल म्हणजे इंद्र देवाचा हा सण असतो. आपल्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी विशेषतः पुत्रप्राप्तीसाठी मुख्य तीन देवांना एकत्रित आणून (तीन देवाच्या नांवाने) पूजाविधी करतात. १. हुडोल देव २. इंदीराजा (इंद्रदेव) ३. करहण (कणचरी) अन्नापूर्णादेवी यांना प्रसन्न करण्याकरिता नवस करतात.

संपूर्ण गांव मिळून साजरा केला जाणारा इंदल म्हणजे गाव गोंदऱ्या इंदल होय. गावगोंदऱ्या इंदल साजरा करण्यामागचा मुख्य उददेश किंवा धार्मिक भावना अशी की, कायम शांती लाभावी, उत्पन्नात भर पडावी, पाऊस भरपूर पडावा. जनावरांना कोणत्याही प्रकारे साथीचे

* मु.पो.भानोली, धडगांव, जि.धुळे

रोग होऊ नयेत. गावातील लोकांवर संकटे, आपत्ती येऊ नयेत म्हणून गांव गोंदन्या इंदल साजरा करतात. ज्या दिवशी इंदल बसवायचा आहे त्याच्या एकदोन दिवस अगोदर संपूर्ण गावातील लोक पोलीस पाटीलाकडे एकत्रित जातात. पोलीस पाटील व गावातील प्रतिष्ठित लोकांच्या निर्णयावरून दिवस ठरविला जातो.

ज्या दिवशी इंदल बसावयाचा आहे त्याच्या एकदोन दिवस अगोदर संपूर्ण गावात आंमत्रण म्हणून (बगर) या अन्नापासून (नेवता) प्रत्येक गावात आंमत्रण पाठविले जातो. समजा बुधवारच्या दिवशी इंदल असेल तर बुधवारच्या एक दिवस अगोदर म्हणजे मंगळवारच्या संध्याकाळी गावातील व परगावातील लोक एकत्र जमतात. जमलेल्या मंडळींबरोबर १० आणि १२ वर्षाची तीन कुवारे मुले गावाबाहेरील पूर्वेस किंवा उत्तरेस कळब (कदंब) झाडाच्या फांदया आणण्यासाठी जातात. रस्त्याने जातांना सगळयांपुढे पुजारा असतो. त्याच्या हातात आरती व पूजेच्या साहित्याचे तबक असते. त्याच्या मागे तीन कुवारे मुले असतात. नंतर पुरूष मंडळी आणि गावातील मुली तसेच स्त्रिया या क्रमाने मिरवणुक निघते. कदंबाच्या झाडाकडे जातांना स्त्रिया इंदिराजाचे स्तुतीपर गाणे गातात. कदंबाच्या झाडाजवळ आल्यावर झाडाच्या बुंध्याजवळ पुजारा पुजेचे साहित्य मांडतो (ठेवतो). सोबत दारूचा तांब्याही असतो. नंतर पुजारा शास्त्रोक्त पध्दतीने झाडाची पूजा करतो. हा पूजाविधी आटोपल्यावर कदंबाच्या झाडाच्या तीन फांदया (डालखे) तोडतात. झाडाखालून लोक त्या फांदया वरच्यावर झेलतात. तीन फांदया सोबतच्या तीन कुवारे मुलांच्या हातात देतात. पहिली फांदी इंदीराजाच्या नावाची (इंद्र) दुसरी कणहर कुवर नावाची असते. तर तिसरी फांदी हुडोल देवाची असते. गावाकडे परततांना नाचत-गाजत जातात. पोलीस पाटीलाच्या घराशेजारी जाऊन उभे राहतात. त्या तिन्ही कुवारे मुलांच्या समोर चादर अंथरून फांदया खाली ठेवतात. पुजारा (भगात) कदंबाच्या फांदयाची पूजाविधी करतो. त्यानंतर क्रमाने

फांदया खडड्यात रोवतात. पहिली फांदी हुडोल देवाची असते. त्यात माती टाकतात. दुसरी फांदी इंदीराजाची असते. (इंद्रदेवाची) त्यामध्ये तांदूळ टाकतात. तिसरी फांदी करहण मातान (कणचर) अन्नापूर्णादेवी अशा प्रकारे क्रमाने फांदया रोवल्या जातात. नंतर पुजारा पूजाविधी करण्यास सुरवात करतो. प्रथमतः धरतीमातेची पूजा, आरतीचे (कोलदिवान) पुजाविधी करतो. वांजत्री पुजारा पुजाविधी करण्यास सुरूवात करतो. प्रथमतः धरतीमातेची पूजा, आरतीची (कोलदिवान) पूजाविधी करतो. वांजत्री वाद्य वाजवतात. इंदल पाहण्यासाठी आलेले लोक एकमेंकांच्या हातात हात बांधून रात्रभर चौफेर नाचतात. काही लोक आंनद मौज मजा लुटण्याकरिता मद्यपान सेवन करून आंनद लुटतात. दुसऱ्या दिवशी कार्यक्रम आटोपल्यावर प्रसाद म्हणून जेवण करतात आणि आपआपल्या घरी परत जातात (परततात).

चुऱ्या इंदल हा सण खाजगी स्वरूपाचा असतो. आर्थिक परिस्थितीनुसार व गावात काही अडचण आली असेल तर चुऱ्या इंदल सण साजरे करतात. या सणाच्या वेळी कोणतेही वाद्य वाजविले जात नाही. फक्त जे पूजाविधीसाठी साहित्य लागणार तेवढेच आणून एका रात्रीतच नवस फेडतात.

खूट जात्रा-सुरीन बादा जर एखाद्या माणसाला पुत्रप्राप्ती होत नसेल. विवाहानंतर एक-दोन वर्षानंतर पुत्रप्राप्ती झाली नसेल, त्यावेळी बुडवाकडे (भगत) जाऊन पूजाविधी केल्यास त्याला एक-दोन वर्षानंतर पुत्रप्राप्ती झाल्यास पांच बर्षानी नवस म्हणून इंद्रदेवाच्या नावाने खुट जात्रा नवस फेडतात. नवस फेडण्यासाठी आर्थिक परिस्थितीनुरूप सण साजरा करतात. आणि जास्त करून हा कार्यक्रम एका रात्रीत आटोपतात.

अशा प्रकारे पावरा समाजात रूढी परंपरेनुसार आजतागायत सण साजरे करतांना सर्रास दिसून येते.

आदिवासी उपयोजनांतर्गत राबविण्यात येत असलेल्या आर्थिक सहाय्याच्या निवडक योजना

* पी.आर.तिकोने,

महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी उपयोजनेच्या वार्षिक योजनेमध्ये सुमारे ३२५ च्या दरम्यान विविध विकासात्मक योजना/कार्यक्रम कार्यान्वित आहेत. दरवर्षी या योजनांसाठी/कार्यक्रमांसाठी राज्याच्या वार्षिक योजनेतून तरतूद करण्यात येते व त्यानुसार उपलब्ध झालेली तरतूद खर्च केली जाते. आदिवासी उपयोजनेची (Tribal Sub Plan) व्याप्ती मोठी असल्याने बऱ्याचदा आमच्याआदिवासी बांधवांना आवश्यक असलेल्या योजनांची नेमकी माहिती उपलब्ध होत नाही. याकरिता राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जात असलेल्या व अर्थसहाय्य प्राप्त होत असलेल्या काही निवडक योजनांची माहिती खालीलप्रमाणे देण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. याशिवाय याच वर्गवारीमध्ये बसणाऱ्या आणि जिल्हाधिकारी/तहसिलदार यांचेमार्फत राबविल्या जात असलेल्या अन्य योजनांची ही माहिती खाली देण्यात आली आहे.

विविध योजनांचा तपशील

१) अ. योजनेचे नांव : सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/प्रकल्प अधिकारी, ए.आ.विकास प्रकल्प

क. विभागाचे नांव : उद्योग विभाग

ड. योजनेचे स्वरुप : ही राज्य योजनांतर्गत योजना असून किमान ७ वी पास झालेल्या १८ ते ३० वयोगटातील स्थानिक बेरोजगार व्यक्ती रु.१.५० लाखापर्यंतचे बीजभांडवल स्वत:च्या उद्योगासाठी प्राप्त करु शकते.

कर्जाचा, बीजभांडवलाचा हिस्सा व स्वत:ची गुंतवणूक याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

* संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १

तक्ता

अ.क्र.	बाब		बीज भांडवल		बँकेकडून मिळणारे कर्ज (%)
			स्वतःची गुंतवणूक %	शासनाकडून मिळणारे बीज भांडवल %	
१)	प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.१ लाखापर्यंत असल्यास				
	अ)	सर्वसाधारण लाभधारक	१०	१५	७५
	ब)	इतर मागासवर्गीय लाभधारक	५	२०	७५
	क)	अ.जा./अ.जमाती लाभधारक	२.५	२२.५	७५
२)	प्रकल्पाची अंदाजित किंमत १ लाखापेक्षा जास्त असल्यास				
	अ)	सर्वसाधारण लाभधारक	१५	१०	७५
	ब)	इतर मागासवर्गीय लाभधारक	१५	१०	७५
	क)	अ.जा./अ.जमाती लाभधारक	१५	१०	७५

सुशिक्षित बेरोजगार व्यक्तीस प्रथम योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांचे प्रकरण बँकेकडे पाठविले जाते. बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यावर विभागीय विकास मंडळातर्फे बीज भांडवल पुरविले जाते.

२) अ. योजनेचे नांव : संजय गांधी स्वावलंबन योजना

ब. संपर्क अधिकारी : तहसिलदार/एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी

क. विभागाचे नांव : कामगार व कामगार कल्याण

ड. योजनेचे स्वरुप : महाराष्ट्र शासनाने २.१०.८० पासून ही योजना सुरु केली आहे. वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळण्यासाठी ज्यांची तारण देण्याची ऐपत नाही अशा सर्व शिक्षित व अशिक्षित या दोन्ही प्रकारच्या बेरोजगार/अर्धरोजगार व्यक्तीस सहाय्य मिळू शकते. छोटे उद्योग, छोटे व्यापारी यांना व्यावसायिक सेवा सुरु करण्यासाठी व त्यायोगे स्वयंरोजगार मिळविण्यासाठी रु.२५००/- इतके बिनव्याजी कर्ज दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी हा १५ वर्षे महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याने रोजगार हमी योजना किंवा सेवा योजना केंद्रात रोजगारासाठी नांव नोंदणी केलेली असावी. कर्ज हे तालुका समितीमार्फत मंजूर करण्यात येते. कर्जाची परतफेड कर्ज घेतलेल्या दुसऱ्या वर्षापासून १० वार्षिक हप्त्यांमध्ये करावयाची असते. यासाठी सवलतीचा व्याज दर आकारण्यात येतो.

३) अ. योजनेचे नांव : छोट्या उद्योगधारकांना कर्ज योजना

ब. संपर्क अधिकारी : महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : उद्योग विभाग

ड. योजनेचे स्वरुप : एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गांवामध्ये व एकूण यंत्रसामग्रीवरील गुंतवणूक रुपये ५ लाखापेक्षा जास्त नसणाऱ्या उद्योजकांना प्रकल्प खर्चाच्या २० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.४०,०००/- मर्यादेपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येते. जर उद्योजक अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचा असेल तर प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.६०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य सीमांत अर्थसहाय्य (मार्जिन मनी) म्हणून दिले जाते. या योजनेस कोणत्याही शिक्षणाची, वयाची अट नाही. या कर्जावर सवलतीच्या दराने व्याज आकारण्यात येते. सदर योजनेमध्ये केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० सहभाग आहे.

४) अ. योजनेचे नांव : कामधेनू योजना

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा समाज कल्याण अधिकारी (महिला व बालकल्याण)/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : महिला व बालकल्याण विभाग

ड. योजनेचे स्वरुप : १९९५-९६ पासून नव्याने सुरु करण्यात आलेल्या या योजनेद्वारे गरजू महिलांना घरबसल्या काम मिळावे व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, असा शासनाचा हेतू आहे. या योजनेअंतर्गत 'नोंदणीकृत महिला संस्थांना' जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका इ.मार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा, संस्था, हॉस्पीटल इ.लागणारे गणवेष, चादरी, उशांचे अभ्रे, रुग्णांचे कपडे, फिनेल, डस्टर, झाडू, साबण, मसाले, पापड, लोणची इ.तयार करण्याचे काम देण्याचे ठरविण्यात आले आहे, ज्यायोगे सदर महिला संस्था आपल्या परिसरातील गरजू महिलांमार्फत हे काम करुन घेतील व रोजगाराची समस्या कमी होण्यास मदत होईल.

५) अ. योजनेचे नांव : दूध उत्पादक/दुग्ध व्यवसाय विकास संस्था/संघ/महासंघ/ यांना व्यवसाय स्थापन्यासाठी अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा दुग्ध विकास अधिकारी/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : दुग्ध व्यवसाय विकास विभाग

ड. योजनेचे स्वरुप : दुग्ध उत्पादनाच्या सहकारी संस्था स्थापन करुन त्याद्वारे दुभत्या जनावरांचे वाटप करणे, उत्पादित दुधांचे संकलन करणे इत्यादी विकासाची कामे केली जातात. याकरिता सहकारी दूध संस्था सक्षम करण्यासाठी ही योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत सहकारी दूध उत्पादन संस्थासाठी ३ वर्षे व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येते. सचिवांना तीन महिन्याच्या कालावधीत व्यवस्थापन प्रशिक्षण दिले जाते.

६) अ. योजनेचे नांव : अवरुध्द पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी/ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी

क. विभागाचे नांव : मत्स्य व्यवयास विकास विभाग

ड. योजनेचे स्वरुप : मत्स्य संवर्धनास योग्य असलेल्या तलावात मत्स्य शेती करुन, गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन वाढविणे हा या योजनेचा हेतू आहे. दरवर्षी मत्स्यव्यवसाय विभागाकडून जलद वाढणाऱ्या कटला, रोह् आणि मृगल मत्स्यबीजांची विक्री करण्यात येते. मत्स्य व्यवसाय विभागाकडून मत्स्यबीज संगोपन (संवर्धन) करणेकरिता तलावाचे निर्मिती करता खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते.

१)	संवर्धन तलावाची निर्मिती	२५ टक्के अनुदान किंवा २०,०००/- मर्यादित
२)	खत व मत्स्य खाद्य खरेदी	२५ टक्के अनुदान किंवा ८,०००/- मर्यादित
३)	तलावावरील गाळ काढणे व सांडव्यावर जाळी टाकणे	२५ टक्के अनुदान किंवा ८,०००/- मर्यादित

७) अ. योजनेचे नांव : मत्स्यव्यवसायोपयोगी आवश्यक सामग्रीच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी/ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी

क. विभागाचे नांव : मत्स्य व्यवयास विकास विभाग

ड. योजनेचे स्वरुप : मासेमारीसाठी लागणाऱ्या नायलॉन जाळी/सूत यासाठी मच्छिमार सहकारी संस्थेच्या क्रीयाशील सभासदांना प्रत्येक वार्षिक ५ किलो नायलॉन सूत/जाळी पुरवठा करण्यात येतो. मासेमारीच्या साधनांच्या खरेदीवर ५० टक्के इतके अनुदान दिले जाते. होडी खरेदीवर प्रति होडीस ५० टक्के अथवा रु.३०००/- मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येते.

८) अ. योजनेचे नांव : मत्स्य व्यवसाय विकास संस्था स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी/ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी

क. विभागाचे नांव : मत्स्य व्यववास विकास विभाग

ड. योजनेचे स्वरुप : मत्स्योत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या जलक्षेत्रापैकी प्रथम एका निवडक भागातील काही तलाव निवडून किंवा शेतकऱ्यांची पडीक जमीन, पाणथळ, जमीन इ.निवडून १ किंवा २ हेक्टरप्रमाणे तलाव बांधणे, सधन मत्स्यशेतीचा विकास साधण्यासाठी अद्यावत तंत्राचा वापर करणे यासाठी विकास संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. या योजनेखाली सहकारी संस्था तसेच खाजगी मच्छिमार यांची निवड केली जाते. अधिक मासळी उत्पादनाचे प्रात्यक्षिक १ वर्ष कालावधीकरिता देण्यात येते. ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र व राज्य शासन ५०:५० या प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन देते. या योजनेखाली व्यवस्थापकीय अनुदान व भागभांडवलासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाते.

१) मत्स्यसंवर्धक तलाव/ तळ्याच्या नूतनीकरणासाठी एका मत्स्यसंवर्धकास = रु.३२,०००/- या दराने येणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के

२) निविष्टावरील अनुदान एका मत्स्य संवर्धकास एकच मत्स्यबीज खरेदी, खत, खाद्यखरेदी इ. = सर्वसाधारणपणे रु.१६,०००/- या दराने येणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के

३) स्वत:च्या जमिनीत नवीन तळे बांधण्यासाठी अनुदान = सर्वसाधारणपणे रु.१ लाख प्रति हेक्टर येणाऱ्या खर्चाच्या २० टक्केच्या मर्यादेपर्यंत

४) प्रशिक्षण (१५ दिवस) प्रत्येक प्रशिक्षणार्थी साठी रु.२५/- प्रतिदिन या दराने विद्यावेतन व जाण्या-येण्याचा खर्च रु.४०/- या

प्रमाणे देण्यात येतो.

टीप * वरील १ ते ३ बाबीवरील अर्थसहाय्य हे आदिवासी उपयोजनेअंतर्गत दुप्पट दिले जाते.

* प्रत्येक नवीन मत्स्यसंवर्धन यंत्रणेकरिता एक मोटार वाहनाच्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम फक्त एकदाच केंद्राकडून मिळते.

९) अ. योजनेचे नांव : लहान शेतकऱ्यांना व्याजाकरिता अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : सहकार विभाग

ड. योजनेचे स्वरुप : कृषी सेवा सहकारी सोसायटीतर्फे शेतकऱ्यांना दरवर्षी पीक कर्ज मिळू शकते. परंतू जे शेतकरी अल्पभूधारक आहेत त्यांचे पीक कर्जावरील व्याजाचा बोजा कमी करण्यासाठी या योजनेद्वारे तरतूद करण्यात येते. व्याजाच्या दराच्या ३ टक्के फरकाच्या प्रमाणात अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य दिले जाते. हे अनुदान नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येते. त्यामुळे त्यांचा व्याजाचा बोजा कमी होऊ शकतो.

१०) अ. योजनेचे नांव : जनजाती क्षेत्रातील आदिवासी सहकारी संस्थांचे शेअर खरेदीसाठी ७ वर्षे मुदतीची बिनव्याजी कर्जे

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : सहकार विभाग

ड. योजनेचे स्वरुप : आदिवासींची उन्नती करण्यासाठी सहकारी तत्वावर आदिवासी सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या असून त्यांना विविध योजनांद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आदिवासी सहकारी संस्थांचे सभासद होण्यासाठी संस्थेचे भाग खरेदी करणे आवश्यक आहे. भाग खरेदीसाठी आदिवासींना प्रत्येकी रु.१०००/- इतके बिनव्याजी कर्ज या योजनेद्वारे देण्यात येते.

११) अ. योजनेचे नांव : आदिवासींना सहकारी साखर कारखान्याचे भाग खरेदीसाठी अर्थसहाय्य

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : सहकार विभाग

ड. योजनेचे स्वरुप : आदिवासींची आर्थिक हलाखीची परिस्थिती लक्षात घेता त्यांना सहकारी साखर कारखान्याचे सदस्यत्व मिळणे शक्य होत नाही.

सहकारी प्रणालीमध्ये त्यांचा वावर व्हावा. औद्योगिक व आर्थिक क्षेत्राच्या विकासात त्यांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने शासनाने साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या व अत्यंत कमी उत्पन्न असलेल्या (अल्पभूधारक) आदिवासी व्यक्तीस साखर कारखान्याचे भाग खरेदी करण्यासाठी प्रत्येक सभासदास रु.३०००/- इतके किंवा भाग भांडवलाच्या पुस्तकी मूल्याऐवढे ५० टक्के बिनव्याजी कर्ज व ५० टक्के अनुदान स्वरुपात देण्यात येते. या योजनेचा लाभ घेणारा सभासद हा साखर कारखाना क्षेत्रातील व स्वत:ची अडीच एकर बागायत व पाच एकर जिरायत जमीन असली पाहिजे. बिनव्याजी कर्जाची परतफेड ३ वर्षानंतर ५ समान हप्त्यात केली जाते. सभासदांची निवड कारखाना समिती करते.

१२) अ. योजनेचे नांव : औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य भागभांडवल

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : सहकार विभाग

ड. योजनेचे स्वरुप : ग्रामीण व शहरी भागातील काडी पेट्या, बांबू उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स, सोनारकाम, सुतार काम इ.वस्तु उत्पादन करण्यासाठी सहकारी संस्थांना शासनातर्फे भागभांडवल, कर्ज अनुदान दिले जाते. संस्थांना वित्तीय सहाय्य खालीलप्रमाणे दिले जाते.

१. भागभांडवल = एकास तीन या प्रमाणात

२. शासकीय अनुदान = प्रथम वर्षासाठी रु.८००/- दुसऱ्या वर्षासाठी प्रत्येकी रु.६००/-

३. हत्यारे/अवजारे विकत घेण्यासाठी = ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान (जास्तीत जास्त रु.२०,०००/- पर्यंत)

४. गोडाऊन बांधण्यासाठी = रु.२.५० लाखापर्यंत अर्थसहाय्य (७५ टक्के कर्ज व २५ टक्के अनुदान या स्वरुपात अर्थसहाय्य माफ होते.)

५. भाग खरेदीसाठी कर्ज = भागाच्या दर्शनी किंमतीच्या ७५ टक्के कर्ज

१३) अ. योजनेचे नांव : मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण मंडळास वित्तीय सहाय्य देणे

ब. संपर्क अधिकारी : जिल्हा समाज कल्याण अधिकारी/ए.आ.वि.प्र.अधिकारी

क. विभागाचे नांव : समाज कल्याण विभाग

ड. योजनेचे स्वरुप : आदिवासी व्यक्ती सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना या योजनेद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना या योजनेखाली अनुदान मिळते. यासाठी आर्थिक दुर्बल घटकांतील व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रु.८४००/- पर्यंत तर अल्प उत्पन्न गटातील व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रु.१८,०००/- पर्यंत असावे. बांधकाम खर्चाची मर्यादा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी रु.१५,०००/- तर अल्प उत्पन्न घटकासाठी रु.३०,०००/- इतकी आहे. 'क' वर्गातील नगरपालिकेसाठी हे अनुक्रमे रु.१२,०००/- व रु.२०,०००/- इतके निश्चित करण्यात आले आहे. ३० टक्के शासकीय अनुदान व २० टक्के व्यक्तीगत वर्गणी व ५० टक्के बिनव्याजी कर्ज या योजनेखाली सभासदांना मंजूर करण्यात येते.

१४) अ. योजनेचे नांव : आदिवासींना मंगलोरी कौले, जी.आय.शीट्स व गवती छपरे बदलण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे

ब. संपर्क अधिकारी : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (माहितीसाठी)

क. विभागाचे नांव : आदिवासी विकास विभाग

ड. योजनेचे स्वरुप : जिल्हा परिषदेमार्फत अतिदुर्गम भागातील आदिवासी लोकांना निवारा निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या मंगलौरी कौले किंवा जी.आय.शीट्स बसविण्यासाठी वस्तुरुपाने रु.२५,०००/- पर्यंत अर्थसहाय्य दिले जाते.

१५) अ. योजनेचे नांव : नैसर्गिक आपत्ती

ब. संपर्क अधिकारी : जिल्हाधिकारी/तहसिलदार

क. विभागाचे नांव : महसूल विभाग

ड. योजनेचे स्वरुप : नैसर्गिक आपत्तीमध्ये भूकंप, आकस्मिक आग, अतिवृष्टी, पूर, वादळ, गारपीट, दरड कोसळणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. नैसर्गिक आपत्तीमधील प्रत्येक व्यक्तीस रु.२५०/- सानुग्रह अनुदान, घरे व गोठा दुरुस्तीसाठी रु.२०००/- ते रु.६०००/- घरगोठा बांधणीसाठी रु.२०००/- ते रु.८०००/- झोपडी

पुर्नबांधणीसाठी रु.२०००/- ते रु.७०००/- कारागिरांसाठी स्वयंरोजगार म्हणून रु.५००/- ते रु.४५००/- शेतजमिनीचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यास रु.४००/- ते रु.८००/- अर्थसहाय्य देण्यात येते. लहान व्यापाऱ्यांचे नुकसान झाल्यास नुकसानीचा ५० टक्के किंवा निकषांनुसार जे कमी असेल ते. तर पिकांचे नुकसान झाल्यास त्यांना नियमानुसार नुकसान भरपाई म्हणून अर्थसहाय्य प्राप्त होईल. याकरिता स्थानिक परिस्थितीचा पंचनामा कागदपत्रे आवश्यक आहे.

१६) अ. योजनेचे नांव : मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी

ब. संपर्क अधिकारी : जिल्हाधिकारी

ड. योजनेचे स्वरुप : एखाद्या कुटुंबातील व्यक्तीचा नैसर्गिक आपत्तीमध्ये, जातीय दंगलीमध्ये मृत्यु झाल्यास किंवा अवर्षण भागात सोयी देणे, दुर्धर रोगाने पीडित व्यक्तीस मदत इ.स्वरुपाच्या कारणांसाठी अर्थसहाय्य प्राप्त होते. हे आर्थिक सहाय्य कारणपरत्वे रु.२५००/- ते रु.१०,०००/- च्या दरम्यान उपलब्ध होते. याकरिता मृत्युचा दाखला, तहसिलदार दाखला, नुकसानीचा पंचनामा इ.कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१७) अ. योजनेचे नांव : भूमीहीन शेतमजूर समूह विमा योजना

ब. संपर्क अधिकारी : तहसिलदार

ड. योजनेचे स्वरुप : नोंदणीकृत भूमीहीन शेतमजूर, वय वर्षे १८ ते ६० कुटुंब प्रमुख असावा आणि तो ग्रामीण भागात राहणारा असावा, अशी पात्रता असलेल्या भूमीहीन शेतमजूरास रु.२०००/- पर्यत अर्थसहाय्य प्राप्त होते. याकरिता दावापत्र, तलाठी प्रमाणपत्र, तहसिलदार प्रमाणपत्र, भरपाई पावती, ओळखपत्र, मृत्यु दाखला, तलाठी नोंद रजिस्टर उतारा इ.कागदपत्रे आवश्यक आहे.

आधार- १. वार्षिक आदिवासी उपयोजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. वार्षिक योजना आराखडा जिल्हा पुणे

विक्रमगडमधील आदिवासी जीवनातील अलिकडील बदल

*सुशीला दिवेकर

प्रास्ताविक

गेली दोन वर्षे मी ठाणे जिल्हयातील विक्रमगड या आदिवासी भागात राहत आहे. तिथे काम करीत असताना दैनदिन कामाचा भाग म्हणून आसपासच्या खेड्यापाड्यातून जाण्याची व तेथील जीवन जवळून पाहण्याची संधी मिळते. वेगवेगळ्या आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुषांशी संबंध येतो. वृध्द व्यक्तींपासून ते नवजात बालकांपर्यंत येणारा हा संबंध असतो. विद्यार्थी-पालक-शिक्षक-शेतकरी-मजूर असे सर्व थरातील लोक विक्रमगडाच्या परिसरातील त्या आदिवासी समाजांत भेटत असतात. काहींचे प्रश्न सुटत असतात तर काही नवीन प्रश्न निर्माण होत असतात. हे सर्व घडत असताना आदिवासी जीवनात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इत्यादी क्षेत्रात हळूहळू का होईना बदल घडतो आहे लक्षात येते.

येथे हे समजून घेतले पाहिजे की, आदिवासी हा एकसंध समाज नाही. त्या समाजातही अनेक जाती आहेत. जातीची उतरंड आहे. कोकणा, वारली यासारख्या काही पुढारलेल्या जातींचे लोक आहेत. तर अति मागासलेले कातकरीही आहेत. एकाच खेड्यात किंवा पाड्यात वेगवेगळ्या जातींच्या स्वतंत्र वस्त्या असतात. आंतरजातीय विवाह फारच विरळा. याही कारणामुळे सर्वत्र जाती-जातीतील फरक बऱ्याच प्रमाणत कायम राहतो. आदिवासी समाजात घडून येणाऱ्या बदलांचा विचार करताना ही सर्व परिस्थिती ध्यानात घ्यावी लागते.

आपण पाहतो की, गेल्या दोन दशकात नागरी व बिगर आदिवासी ग्रामीण भागातही बदल घडून येत आहेत. ते मुख्यतः संपर्क साधनातील क्रांतीमुळे. याचा अर्थ पाण्यासारखे

* १९१, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२.

दैनंदिन आवश्यकतेचे प्रश्न सुटले आहेत, असे नव्हे. पण लोकांच्या विशेषतः आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनात या संपर्क क्रांतीमुळे फरक घडून येत आहे. उदा.विक्रमगडच्या सुमारे तीनशे वस्तीच्या टोपल्या पाड्यात आजमितीस एकोणीस घरी टी.व्ही.संच वापरले जात आहेत. ट्रॉन्झिस्टर तर आहेतच. काही ठिकाणी टेलिफोनही आले आहेत. गांवाबाहेर रस्त्यावरुन जातांना कनिष्ठ महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या घोळक्यातून आता हिंदी फिल्मी गीते ऐकू येऊ लागली आहेत. तेव्हा आजवर शतकानुशतके नागरी प्रगत समाजाहून बाजूला राहिलेला आदिवासी समाज यापुढे फार काळ आपले वेगळेपण टिकवून धरु शकेल, असे वाटत नाही.

संबंध भारतातच लोकसंख्येचे, बेकारीचे, एकंदर दारिद्र्याचे, निरक्षरतेचे, अज्ञानाचे, स्त्री गुलामगिरींचे, पाण्याचे, दोन वेळच्या अन्नांचे प्रश्न आहेत. अंगभर कपड्यांचे, थंडीत उबदार कपड्यांचे, पावसाळ्यात डोक्यावरील छत्रीचे, चटके बसवणाऱ्या उन्हांत पायांतील पादत्राणांचे असे असंख्य उणिवांचे लहानमोठे प्रश्न आपल्या प्रजासत्ताक स्थापनेस पन्नास वर्षे होऊनही जवळजवळ आहेत तिथेच आहेत. मग विक्रमगडसारख्या आदिवासी भागातएकूण परिस्थिती याहून बिकट असल्यास आश्यर्च वाटावयास नको. जे बदल दिसत आहेत ते वरवरचे दिखाऊ, ज्यांना 'कॉस्मेटिक' म्हणतात, अशा स्वरुपाचे आहेत, असेच म्हणावेसे वाटते.

आदिवासी समाजातील दैनंदिन जीवनातील मुख्य घटक

अन्न - विक्रमगड परिसरातील आदिवासींचे मुख्य अन्न म्हणजे भात. त्याच्या जोडीला जेवणात कुठेकुठे नाचणी, वरई, तूर, मूग, कडधान्य व त्यांचे पदार्थ, भाजीपाला, मासळी, सणाच्या दिवशी कोंबडी, पण हे सर्व जमेल तसे व जमेल त्यादिवशी. यांतही जातीजातीतला फरक आहेच. कातकऱ्यांच्यात अजून रोजची केवळ पिठाची आंबीलच असते. गांवात काही हॉटेल, चहाच्या टपऱ्या निघाल्या आहेत. त्यामुळे पुरुषांच्या पोटात दूध घातलेला चहा, वडापाव असले पदार्थ अधूनमधून जातात. पण अजूनही असंख्य आदिवासी कुटुंबांत दोन वेळेला जेवण भेटण्याची वानवाच असते. दारुचे प्रमाण मात्र आहे तसेच आहे. अलिकडे श्री.पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या 'स्वाध्याय' प्रसारामुळे तसेच वारकारी संप्रदायामुळे काही काही कुटुंबे दारुच्या

मोहातून (दारु मोहाच्या फुलांची किंवा गुळाची असते.) सुटका करुन घेत असल्याचे दिसते.

पाणी - पाणी लांबून वाहून आणायचे केवळ घरातील बायकांचेच काम. लहान मुलींपासून प्रौढ स्त्रियांपर्यंत डोक्यावर घागरींची उतरंड आणि काखेत घागर असे दृष्य आदिवासी खेड्यापाड्यात कायमचे दिसते. आजवर आदिवासी पुरुष कधी पाणी वाहताना पाहिला नाही. कुठे कुठे पाड्याच्या आसपास नव्याने विहिरी झाल्या आहेत. पण बहुतेक ठिकाणी पाणी आणण्यासाठी फर्लांग दोन फर्लांग जावेच लागते. रोजचे हाल नशिबी आले म्हणजे ते हाल वाटेनासे होतात. त्यांचीच सवय होते. तसेच झाले आहे. अनेकदा पिण्याचे पाणीही स्वच्छ निर्मळ असत नाही. त्यामुळे रोगराई पसरते ते वेगळेच. डोक्यावरुन पाणी वाहण्याऐवजी एखाद्या पाण्याच्या गाडीचा शोध लागला (आदिवासी आदिवासींनी तो स्विकारला.) तर स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने ते एक क्रांतीकारक पाऊल ठरेल असा विचार रोज मनांत येतो. आदिवासी स्त्रियांचे पाणी वाहण्याचे रोजचे कष्ट जेव्हा संपतील तो खरा सुदिन म्हणावा लागेल.

निवास - आदिवासींची घरे साधारणपणे कुडाची असतात. आकाराने मोठी असतात. ती सारवून स्वच्छ ठेवलेली असतात. घरांतील आतील रचना साधारणपणे सर्वत्र सारखी असते. एक मोठी (२० ते २५ फूट बाय १५ ते २० फूट) हॉलवजा खोली व त्या खोलीच्या एका कोपऱ्यात साधारण १०० चौ.फू.ची स्वयंपाक इ.साठी उपखोली. बस हीच रचना साधारणपणे सर्वत्र आढळते. आर्थिक सुस्थिती आली की, यांत थोडा फरक होतो. भिंती विटांच्या होतात. छपरावर मंगलौरी कौले चढतात. पण आंतील रचना सहसा फारशी बदलत नाहीत. आताशा शासकीय धोरणानुसार आदिवासींना नवीन घरे बांधून देण्याच्या काही योजना आहेत. त्यानुसार नवीन घरे बांधली जात आहेत. ती आकाराने लहान व आंत छोट्या छोट्या दोन तीन खोल्या असलेली असतात. आदिवासींना ती रचना पसंत पडत नाही. काही ठिकाणी अशी घरे रिकामी पडण्याच्या विविध कारणांत हे मानसिकतेचे कारणही असावे, असे वाटते.

वस्त्र - पुरुषांच्या पेहेरावात आता सर्वत्र शर्ट आणि पँट आलेली आहेत. स्त्रियांच्या पोशाखात

अजून जुनी विविधता शिल्लक आहे. लुगडे नेसण्याच्या पध्दतीवरुन ही वारली स्त्री, ही ठाकूर, ती कातकरी असे सध्यातरी ओळखता येते. पण तरुण मुलींच्या व बालिकांच्या पोशाखात झपाट्याने बदल होत आहे. घरगुती वापरासाठी गाऊन आणि बाहेर वावरतांना साडी, सलवार-कमीज, विद्यार्थ्यांचे गणवेष, असे सर्वत्र पहावयास मिळते. याच अनुषंगाने सांगावयाचे म्हणजे आता एकूण एक सर्व आदिवासी मुलींची नांवे अत्यंत आधुनिक असतात. ऐश्वर्या, सुश्मिता, पूनम, संगिता इ.आता आमच्या विक्रमगडला एक 'ब्युटी पार्लर' ही निघाले आहे.

आरोग्य - आदिवासींचे सर्वसामान्यपणे आरोग्य बरे असते. शरीरे काटक व सडपातळ असतात. लठ्ठ आदिवासी सहसा आढळत नाही. पण चौरस आहार नसल्याने, दूषित पाणी पोटात जात असल्याने, अति श्रमाने अशा काही कारणामुळे लोक आजारीही पडत असतात. कुपोषण, पोटाचे विकार, सततचा ताप, असे पहावयास मिळते. पूर्वी लोक भगताकडे जात असत. पण आता डॉक्टरांकडे जाण्याचे प्रमाण वाढले आहे. सरकारी आरोग्य केंद्रही असते. पण बहुतेक खेड्यापाड्यातून डॉक्टरांकडे जायचे म्हणजे तीन, तीन मैल चालत जावे लागते. त्याला पर्याय नसतो. डॉक्टरातही काही कुशल आणि प्रामाणिक असतात. तर काही निव्वळ धंदेवाईक असतात. आदिवासींनाही 'सुई टोचणारा' सलाईन लावणारा, महागडी औषधे लिहून देणारा डॉक्टर जास्त हुशार वाटतो. विक्रमगडसारख्या ठिकाणी या अनुकुल परिस्थितीमुळे सात आठ हजार वस्तीच्या गांवात विविध पदवी, पदविकाधारक अकरा डॉक्टरांनी आपले दवाखाने थाटले आहेत. जास्तीचे पैसे मिळवयाचे आणि औषधपाण्यांत घालवयाचे असे अनेक आदिवासींच्या बाबतीत अलिकडे घडत आहे.

शिक्षण - अनेक खेड्यातून ६०-६५ वर्षापूर्वी प्राथमिक शाळा स्थापन झाल्या आहेत. विक्रमगडची 'पूर्व प्राथमिक शाळा' तर १९०७ साली स्थापन झालेली आहे. असे असूनही निरक्षतरेचे प्रमाण फारसे कमी होत नाही. बहुतेक खेड्यातील आणि मोठ्या पाड्यातील ज्या शाळा असतात त्या एक शिक्षकी असतात. म्हणजे एका खोलीत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग. एकेक वर्ग म्हणजे मुलांची एकेक ओळ. काही ठिकाणी साधारपणे दोन शिक्षकी शाळाही असतात. एक बरे आहे. मुलांना नापास न करण्याचे धोरण

असल्यामुळे सर्वच मुले वरच्या वर्गात चढत किंवा चढवली जातात. त्यालाच शैक्षणिक परिभाषेत उत्तीर्ण आणि उत्तरित असे म्हणतात. त्यामुळे '१० वी नापास' याला फारसा अर्थ नसतो. त्यामुळे नवीन शासकीय धोरणाप्रमाणे पहिलीपासून इंग्रजीच काय पण फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी अशा जागतिक महत्वाच्या आणखी काही भाषा शिकण्याचा फतवा काढला तरी बिघडत नाही. सध्याच्या बिचाऱ्या प्राथमिक शिक्षकांना (आणि खरे सांगावयाचे तर बऱ्याचश्या माध्यमिक शिक्षकांनाही) इंग्रजीतून साधी दोन वाक्येही बोलता येत नाही. त्यांच्याकडून जास्तीची अपेक्षा करणे हे त्यांच्यावर अन्यायकारक आहे. रेडिओ, वर्तमानपत्र, शहरवासियांशी वाढता संबंध यामुळे खूपसे आदिवासी आता विशेषतः पुरुष वर्ग,बाहेरील व्यवहार करताना शहरी, मराठीचा वापर करु लागला आहे. साधारण प्रत्येक आदिवासी जातीची स्वतंत्र वेगळी बोलीभाषा असते. बायकांच्या तोंडात ती अजून टिकून आहे. आदिवासींची बोलीभाषा कानाला गोड वाटते. पण हळूहळू ती सामान्य मराठीत विरघळून जाणार अशी चिन्हे दिसत आहेत.

<u>सुशिक्षित बेकार</u> - आदिवासी खेड्यापाड्यातून आठवी, नववी पास किंवा नापास किंवा दहावी नापास अशांना सुशिक्षित म्हटले जाते. अशी अनेक तरुण मुले शेतीमध्ये काहीतरी काम करीत असतात. ही छुपी बेकारीच असते. दुसरीकडे कामधंदा मिळाल्यास लगेच ते तिकडे जातात. म्हणून नेहमीच्याच शालेय शिक्षणऐवजी इलेक्ट्रीशियन, रेडिओ दुरुस्ती, फोटोग्राफी, नर्सरी, शिवणकाम अशी व्यावसायिक शिक्षण केंद्रे किंवा पारंपारिक कला केंदे फार मोठ्या संख्येने निघावयास हवी आहेत. काही ठिकाणी ती निघतही आहेत. पण म्हणावा तसा व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार झालेला दिसून येत नाही. आदिवासी चित्रकला, वेतकाम, बांबूकाम, विणकाम, छत्र्या, खुर्च्या, पेट्या इ.कलात्मक गोष्टी बनविणे हेही फार मोठ्या प्रमाणात व्हावयास हवे. शहरात, परप्रांतात आणि परदेशातही आदिवीस कलात्मक वस्तुंची विक्री केंद्रे स्थापन व्हायला हवीत. ही केवळ स्वप्ने वाटावीत, अशी आजची स्थिती आहे. (पण आजवर कित्येक दशके हजारो कोटी रुपये आदिवासी उपयोजनातून खर्च झाले. त्याचे काय असा प्रश्न मनांत आल्याशिवाय राहत नाही.)

वरील काही विचार हे नेहमीच्या संशोधन

पठडीतील नाहीत. ते स्थानिक अनुभवावर आधारीत असे आहेत. कामासाठी आदिवासी खेड्यापाड्यातून हिंडताना असे लक्षात येते की, आदिवासी मुले तरुण-तरुणी चुणचुणीत व हुषार आहेत. प्रामाणिक आहेत. त्यांच्या भाषेत, वेषभूषेत, केशभूषेत बदलही झालेला आहे. अनेकांचा व्यवसायाच्या निमित्ताने शहरांशी संबंधही येतो आहे. पण हे सर्व बदल वरवरचे आहेत. आर्थिक स्तरात वाढ होऊन त्यामुळे जे बदल घडून येतील ते अधिक महत्वाचे. ती उणिव अद्याप अनेक योजना होऊनही अजून जवळजवळ तशीच आहे. आता आदिवासी विभागात आधुनिक पध्दतीची कारखानदारीही येत आहे. विक्रमगड तालुक्यातही अलिकडे शासकीय धोरणानुसार अशी कारखानदारी सुरु होऊ शकणार आहे. तेव्हा स्थानिक आदिवासी जीवनात जे बदल होतील ते पुढील काळच ठरवील.

आदिवासींची दिवाळी

* प्रभाकर कासेकर

श्रीमंत आणि मध्यमवर्गीयांची दिवाळी नेहमीच असते. परंतु वर्षातून येणारी दिवाळी आता आदिवासी बांधवही उत्साहाने आणि आनंदाने साजरी करतात. ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, वाडा, तलासरी, शहापूर सारख्या आदिवासी भागात आदिवासींची दिवाळी विशेष उल्लेखनीय असते. या सणाच्या माध्यमातूनही आदिवासींच्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होत आहे.

आदिवासी म्हटला की डोंगरदऱ्यामध्ये राहणारा, लंगोटी लावलेला कष्टकरी आदिवासी बांधव आपल्या डोळयासमोर उभा राहतो. भोळा-भाबडा, अबोल आणि पापभिरु, दैववादी आणि परंपरावादी, परंतु प्रामाणिक, निसर्गात रमणारा, सांस्कृतिक आनंद लुटणारा आदिवासी समाज ही एक संस्कृती आहे.

ठाणे जिल्हयात जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड, तलासरी, शहापूर सारख्या आदिवासी भागातील ही आदिवासी संस्कृति अन्य भागापेक्षा वैशिष्टयपूर्ण अशी आहे. आदिवासींचा पेहराव, वागणे, बोलणे, चालीरिती, धार्मिक कार्ये, सण-उत्सव यातून त्यांच्या संस्कृतीचे विलोभनीय दर्शन घडते.

पेहरावात विविधता

आदिवासींमध्ये वारली, ठाकर, कातकरी, कोळी, कुणबी, कोकणा अशा विविध जाती असून कोळी जातीत राजकोळी, महादेव कोळी, ढोरकोळी या पोटजाती आहेत. या प्रत्येक जाती-जमातीत आदिवासींच्या पेहरावातही विविधता आढळते, कमरेला लंगोटी, गुडघ्यापर्यंत धोतराचा काचा आणि अंगात कोपरी असा पुरुषांचा पोशाख असतो. महादेव कोळी, कोकणा, ठाकर या जमातीच्या स्त्रिया डोक्यावर लाल रंगाचे 'फडकी अथवा सुडकी' नावाचे वस्त्र घेतात तर भिल्ल समाजातील स्त्रिया नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे करुन एक नेसतात आणि दुसरे

* जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

डोक्यावरुन घेतात.

वारली सांस्कृतिक ठेवा

आदिवासींची वारली चित्रकला प्रसिध्द आहे. दसरा-दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने त्यांची ही चित्रकला अधिक बहरते. वारली जमातीत घराच्या भिंतीवर चित्रे काढतात. हाताने ठसा उमटवतात, याला मुठीचा देव म्हणतात. घराच्या भिंतीवर काढलेल्या चित्रांना चौक म्हणतात. तांदुळाच्या पिठांनी चित्रे काढतात. एका चौकोनात चंद्र, सुर्य, अग्नी इत्यादि देवतांची चित्रे असतात. लग्नासाठी निघालेला नवरा-नवरी, सासु-सासरा यांची प्रतिकात्मक सुंदर रेखीव चित्रे असतात. चित्रकलेप्रमाणेच आदिवासी बांधवांची वाद्ये, प्रसाधने, आभूषणे, गवताच्या टोप्या, सिंदीच्या पानांची खेळणी, लाकडी कोरीव कामे, मातीच्या व धातुच्या देवदेवता, बांबूच्या कलावस्तू या सणांच्या निमित्ताने सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

तारपा नृत्य

आदिवासींच्या जीवनात नृत्याला मोठे स्थान आहे. कोणत्याही आनंदाचा प्रसंग असो वा धार्मिक विधी असो, आदिवासी आपला आनंद नृत्यातून व्यक्त करतात. 'तारपा' हा ठाणे जिल्हयातील आदिवासींचा एक वैशिष्ट्यपूर्ण नृत्य प्रकार. तरफार अथवा ताफा यावरुन तारपा हे नाव या नृत्यप्रकाराला दिले गेले असावे असे सांगण्यात येते. तारपा नृत्य हे आदिवासी बांधव केव्हाही करीत नाहीत. तर सुगीचा काळ सुरु झाल्यानंतर त्यांच्या या तारपा नृत्याला अधिक रंग चढतो. दसरा-दिवाळीला त्यांचे हे नृत्य बहरात येते. रानफुलांनी नटलेल्या, मण्यांच्या माळांनी सजलेल्या, पक्षांची रंगीबेरंगी पिसे लावलेल्या आदिवासी युवती आपल्या सवंगड्याबरोबर ढोलाच्या तालावर देहभान हरवून नाचतात. ढोलकी, घुंगरु, डफ आदि वाद्यांच्या तालावर आदिवासी नृत्य करतात. प्राण्यांचे विविध मुखवटे घालूनही ते नृत्य करतात. नगारा, तराफा, बासरी इत्यादि आदिवासींच्या कलाकृती त्यांच्या कृषि जीवनाशी निगडित आहेत. या नृत्य आणि कलाकृतींतून आदिवासींनी आपल्या मौलिक संस्कृतीचे जतन केले आहे.

सुगीची दिवाळी

आदिवासी बांधवांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून भात, नागली, वरी ही पिके ते घेतात. जेमतेम चार महिने पोटाला पुरेल एवढे उत्पन्न त्यांना शेतीतून मिळते आणि शेतीचा हंगाम संपल्यानंतर रोजगारासाठी ते स्थलांतर करतात. जंगल भागात कंदमुळे, झाडपाला खाऊन जगणारी आदिवासी जमात आजही दुर्गम भागात आढळते. पण ही परिस्थिती आता बदलू लागली आहे.

अत्यंत हलाखीचे जीवन जगणाऱ्या या कष्टकरी आदिवासी बांधवांच्या जीवनात पावसाळ्यानंतर शेतीचे उत्पन्न हाती आल्यानंतर सुगीचा काळ येतो. नवे अन्नधान्य हाती आल्यावर कष्टाने पिकविलेले चार चांगले घास समाधानाने खाता येतात. या सुगीच्या काळात येणारी दिवाळी त्यांच्या जीवनात भरभराट आणणारी ठरते.

वाघ बारस

वाघ बारस म्हणजेच आश्विन वद्य द्वादशीला येथील आदिवासींचा दिवाळी सण खऱ्या अर्थाने सुरु होतो. वर्षभरात भोगलेल्या हालअपेष्टा, केलेले काबाडकष्ट विसरुन दिवाळीचा आनंद मनसोक्त उपभोगण्यास ते सिध्द होतात. नवीन अन्नधान्य घरात आलेले असल्याने खिशात चार पैसे असतात. या पैशातून ते नवीन कपडे, दागिने वस्तू खरेदी करतात. दिवाळीला नवे कोरे कपडे, दागिने घालून मिरविण्यात या आदिवासी बांधवांना मिळणारा आनंद वेगळाच असतो.

पर्यावरणाचा संदेश

सुगीच्या काळातील नवे अन्नधान्य हाती आले तरी दिवाळी सणाच्या आधी हे आदिवासी बांधव त्याचा उपभोग घेत नाहीत. दिवाळीपूर्वी हे धान्य खाल्ले तर देवाचा कोप होईल अशी त्यांची श्रध्दा असते. म्हणून दिवाळीला पानवली म्हणजे कोनफळाच्या पानात पीठ घालून चवळीची भाकरी केली जाते. पूर्वजांनी या चालीरितीमध्ये पर्यावरणाचा संदेश दिलेला असावा, असे दिसते.

पोस्त म्हणजेच फगवा

आदिवासी बांधवांमध्ये दिवाळीच्या दिवशी गावातील वा पाड्यातील गाव प्रमुख, जमीनदार यांचेकडे जाऊन पोस्त मागण्याची पध्दती आहे. याला आदिवासी भाषेत 'फगवा' म्हणतात. तो कृतज्ञतेच्या भावनेतून देतात. अलिकडे हा समाज शासनाच्या

आर्थिक विकासाच्या योजनांमुळे स्वतःच्या पायावर उभा राह् लागल्याने ही 'फगवा' पध्दती बऱ्याच प्रमाणावर कमी झाल्याचे दिसून येते.

अंधश्रध्देतून उत्कर्षाकडे

महाराष्ट्र शासनाने आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष दिल्याने आदिवासी समाज अंधश्रध्देतून उत्कर्षाकडे वाटचाल करु लागला आहे. दारुच्या आहारी गेलेला, अंधश्रध्दा, गरिबी यामध्ये पिचलेला हा समाज आता आदिवासी आश्रमशाळांमुळे शिक्षित होऊ लागला आहे. संगणकासारख्या नव्या जगाची ओळख त्यांना होऊ लागली असून एकविसाव्या शतकात हा समाज दारिद्र्यमुक्त झालेला असेल अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही.

जीवनमान उंचावेल

महाराष्ट्र शासनाच्या योजनांतून आदिवासींना शेतीसाठी बी-बीयाणे, खते, शेतीपंप त्याचप्रमाणे उद्योगधंद्यासाठी मिळणारे आर्थिक सहाय्य यामुळे येथील आदिवासींचे जीवनमान उंचावू लागले आहे. जव्हारच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाने बायफच्या सहकार्याने राबविलेल्या 'वाडी प्रकल्पा' मुळे आदिवासींनी आंबा बागायती उभ्या केल्या आहेत. सिंचनाच्या सुविधा वाढल्याने शेतीबरोबर भाजीपाला, उन्हाळी पिके यातून आर्थिक उत्पन्न मिळू लागले आहे. सहकारी वीट भट्टी प्रकल्पामुळे रोजगाराच्या संधी गावातच मिळू लागल्याने रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबण्यास चांगली मदत झाली आहे.

आदिवासी तरुणांना स्वयं-रोजगारासाठी आर्थिक मदतीबरोबरच पोलीस, सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण, वाहनचालक प्रशिक्षण यामुळे चांगल्या नोकऱ्या मिळू लागल्या आहेत. बेंजोसारखे साहित्यही व्यवसायासाठी उपलब्ध करुन दिले जात आहे. यामुळे येथील आदिवासींचे जीवनमान उंचावले गेले आहे.

आदिवासींच्या जीवनात प्रगतीमुळे परिवर्तन होत असले तरी त्यांची संस्कृती मात्र बदललेली नाही. आदिवासी संस्कृतीचा ठेवा जपण्यासाठी शासन नृत्यकला, चित्रकला, हस्तकला यांनाही प्रोत्साहन देत आहे. आदिवासींच्या जीवनात आता समृध्दी येऊ लागल्याने दिवाळीचा आनंद ते खऱ्या अर्थाने उपभोगू लागले आहेत.

आदिवासींची गोटूल/घोटूल परंपरा

* श्रीमती वसुधा नाईक

भारतीय आदिवासी समाजाची विभिन्न प्रकारची संस्कृती आहे. आदिवासींना वनवासी, अरण्यवासी संबोधले जाते. कारण ते मूलतः वनात राहतात. जेथे नागरी संस्कृतीची अजिबात छाप नव्हती. प्राचीन काळापासूनच नागरी संस्कृती व आदिवासी संस्कृतीमध्ये संघर्ष होत आलेला आहे. ज्याची साक्ष आम्हाला सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेदात मिळते. वैदिक ऋषींनी अरण्यात आश्रम स्थापन केले. परंतू त्यांचे ह्या अरण्यवासीयांशी जवळचे नाते असलेले दिसून येत नाही, परंतू एखाद दुसरे उदाहरण सर्व प्रमुख काळात दिसून येते. त्याच आधारावर आपण दोन्ही संस्कृतीशी सौदार्हपूर्ण संबंध होते, असे म्हणू शकतो. उदा.वृत्र, शबरी, गुह पासून ते मध्यकाळापर्यंत परंतू काही अपवाद सोडले तर नागरी संस्कृतीने अरण्यवासियांचे शोषणच केले आहे. आदिवासींच्या संस्कृतीच्या उज्वल भवितव्याबद्दल काही प्रयत्न अलिकडच्या काळात झाले परंतू ते म्हणावे तितके परिणामकारक दिसून येत नसल्याने त्यांच्याशहरीकरणामुळे हळूहळू संस्कृती लोपावत चाललेली आहे.

गोटुल ही आदिवासींची अत्यंत महत्वपूर्ण संस्था आहे. जी अनादिकाळापासून चालत आलेली होती. ती आता बंद पडत चालली आहे. आता मात्र घोटूल संस्थेचे अध्ययन व दर्शनही दुर्मिळ झाले आहे.

गोटुलची उत्पत्ती आदिवासींच्या प्रचलित मान्यतेनुसार लिंगो देवतेने केली होती. त्यांचा मुख्य उद्देश युवक-युवतींना संस्कारक्षम करुन वैवाहिक जीवनात प्रवेश करुन समाजायोग्य सदस्याची जबाबदारी पार पाडण्यालायक बनविणे. या संस्थेला फक्त यौवनाचाराचे केंद्र मानणे योग्य होणार नाही.

घोटूल म्हणजे तरुण मुला-मुलींनी एकत्र समुदाय करुन राहणे. याला कुमारगृह देखील म्हणतात.या गृहात त्यांना सामाजिक, राजनैतिक आणि धार्मिक जीवनाविषयी शिक्षण दिले जाते. हे एक प्रकारचे आर्थिक संघटन आहे. गोटूल ही नवयुवकांना सामाजिक व आर्थिक अन्य

*संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कर्तव्याचे प्रशिक्षण देणारी पाठशाळाच आहे व युवकांची सृजनशक्ती वाढविणारी धार्मिक रितीरिवाज शिकविणारी संस्था आहे. गोटूलचा मुख्य उद्देश केवळ कामवासनांची पूर्ती करणे नसून आर्थिक सहयोग हा मुख्य आधार आहे. याच आधारावर शिकार करणे, शेती करणे, वनोत्पादनाचा संग्रह करणे हा आहे.

गोटुलांची नांवे

गोटूल शब्दाचे स्थानपरत्वे व जमातीपरत्वे भिन्न भिन्न नांवे आहेत. आसामातील गारो जमातीत कुमारगृह, - ओरिसातील उराँव जमातीत जोख, एरया, धुमकुरिया, पूर्वोत्तर भारतातील ब्रम्हपूत्र नदीवर्ती आदिवासी क्षेत्रात मोरुंगा म्हणतात. नागा जमातीत गोटूल दोन अर्थांनी समजले जाते. 'इखुउंची' आणि 'इलइची' इखुउंची म्हणजे युवकांची व इलइची म्हणजे युवतींचे घोटुल. हिमाचल प्रदेशातील भेदिया आदिवासीमध्ये रंगबंग म्हणतात. तर छोटा नागपूर क्षेत्रात राहणारे मुंदडा जमातीत 'गिटीओर' म्हणतात. अवुझमाड आदिवासी 'कोस होटली' म्हणतात. परंतू हे अन्य गोटुलांपेक्षा थोडे भिन्न आहे. यात युवक यवती नाच गाणे एकत्र करतात. परंतू रात्री आपल्याच घरीच झोपतात व अन्य घोटुलात तेथेच विश्रांती घेतात. आसाममधील गोरा जमातीत गोटूल दोन नांवाने ओळखले जाते. एक म्हणजे 'नोकपन्धे' दुसरे कुमारगृह. नोकपन्धेमध्ये लहान मुलांचा वर्ग होय. यात मुलगा ७ वर्षाचा झाल्यावर त्याला गोटुलमध्ये प्रवेश देण्यात येतो.

गोटूलाचे नियम

भारतातील गोटूल सदस्यांशी संबंधित नियम प्रथमदर्शी सारखेच आहे. परंतू स्थानविशेष आणि वातावरणाच्या आधारे या नियमात परिवर्तन केलेले आढळते. उदा.बस्तरमधील गोटूलात सात ते १६ वर्षाच्या युवक युवतींना प्रवेश दिला जातो.

१. गोटूल मधल्याच प्रेमीपैकी किंवा अन्य मुलीशी विवाह करुन दिला जातो.

२. दुसरे असे की समजा, एखादी मुलगी गोटूलात गर्भवती राहिली तर तिच्या प्रियकराचे नांव विचारुन दोघांचे लग्न लावून दिले जाते.

३. विवाहानंतर विवाहीत दांपत्य गोटूलात राहणे वर्ज्य करतात. परंतू गोटूलाचा सरदार त्यांच्याकडून वचन लिहून घेतो की, त्यांना झालेली संतती गोटूलात अवश्य पाठवू.

४. विवाहानंतर जर गोटूलात मुलाचा अथवा मुलीचा कोणी प्रियकर असेल तर त्याला नेहमीकरिता विसरुन जावे लागेल. तसेच मुलाकडून देखील असेच वचन घेतात, आणि हे वचन ते पाळतात.

५. गोटूलातील कमी वयाच्या मुलांना अग्निसाठी लाकूड गोळा करणे, संदेशवाहकांचे काम करणे, गोटूलाची साफसफाई करणे आणि मोठ्यांची आज्ञा पाळणे इत्यादी कामे बंधनकारक आहेत.

६. गोटूलांच्या सरदाराला अत्यंत मान असतो. जर गोटूलांच्या सदस्यांनी सरदाराचा कोणी अपमान केला तर त्याच्यावर बहिष्कार घातला जातो व त्याच्याशी असलेले सामाजिक संबंध तोडले जातात. आणि सरदाराची क्षमायाचना करावी लागते.

७. गोटूलात एखाद्या सदस्याने चोरी केल्यास सरदार त्याला शिक्षा करतो. या शिक्षेस 'दोरीला सजा'असे म्हणतात. अपराध्याच्या पायाला दंडा बसवून त्याला जमिनीकडे झुकवून उभे ठेवतात.

८. गोटूलातील सर्व सदस्याना आपल्यापेक्षा मोठ्या माणसांना नमस्कार करण्याचा नियम आहे. याला 'रामजुहार' प्रथा म्हणतात.

९. निर्धारीत तिथीनुसार गोटूलातील देवीदेवतांची पूजा होते व त्यात सगळ्या सदस्यांना भाग घेणे आवश्यक आहे.

इत्यादी नियम गोटूलांतील सदस्यांना पाळावे लागतात.

गोटूलातील जोडीदाराची निवड

जोडीदाराची निवड करणे आदिवासीमध्ये बहुप्रचलित आहे. त्यासंबंधी अनेक रितीरिवाज आहेत. विवाहप्रथा आहेत.

लग्नसेना प्रथा (कोरकू)

वधूमूल्य प्रथा भगोरिया प्रथा, ठाठीया प्रथा, अस्या विवाह, घरघुशी विवाह या प्रथा प्रचलित आहे. ज्याद्वारे जोडीदाराची निवड करतात. जोडीदाराची निवड गोंड माडियामध्ये प्रचलित आहे. जर एखाद्या मुलाला मुलगी आवडली असेल व त्या मुलीला हे माहित नसेल तर मुलगा आपले प्रेम व्यक्त करण्याकरिता बांबूच्या सुरईत मदिरा भरुन तिच्या घरी जातो व

आपल्या येण्याचे प्रयोजन सांगतो किंवा मुलीला तंबाखु मागतो. तंबाखु मागण्याचा अर्थ असा की, मुलगा मुलीवर प्रेम करतोय. आणि मुलीने तंबाखू दिली तर मुलाने ठेवलेला लग्नाचा प्रस्ताव मुलीला मान्य आहे. त्याचे प्रेम पवित्र आहे व नंतर त्यांना विवाहबंधनात बांधले जाते. जोडीदाराची निवड करण्यासाठी गोटूलातील युवक-युवती गांवात जेव्हा जत्रा भरते तेव्हा तेथे एकत्र जातात व मुले मुलीला कंगवा, अंगठी, घुंगरु भेट देतात. पान खाऊ घालतात. जर ह्या वस्तु देऊ शकत नसतील तर फूल भेट म्हणून देऊन जोडीदाराची निवड करतात.

गोटुलातील देवीदेवता

गोटुलातील प्रमुख देवी देवता कोरी देवी, गेवडा लिंगो देवी, करेदंगल, नारायणदेव, कारापाकडून (वनदेव) मासुळदेवी, कोरता पांडु (वरुण देव, इंद्रदेव) कोरे पंडून (भूमीदेवता) इरार (चिंचेची देवी) भक्तीदेव (आंब्याच्या झाडावर राहणारा देव) नंदी, दंतेश्वरी देवी, अन्नमदेव, बरियापेन इ.देवी देवतांची पूजा गोटुलातील सदस्य करतात.

गोटुलातील वृक्ष

गोटुलाच्या आसपास मोह, साल, कोहा, सागवान, चिंच, पिंपल, आंबा, बोसचे झाड , कदंब, टेसू, चाफा, झेंडू चमेली इत्यादी

आदिवासी समाजात ही सामुदायिक शयनगृहे निर्माण झाली, त्यामागची काही संभाव्य कारणे संशोधकांनी दिलेली आहेत. जंगली श्वापदांपासून आणि इतर टोळ्यापासून स्त्रियांचे गुरांचे रक्षण करण्यासाठी निष्णात धुनुर्धरांना व शिकाऱ्यांना एकत्र ठेवण्याची गरज त्या समाजात निर्माण झाली असावी व पुढे त्यातूनच गांवातील सर्व तरुण मुला-मुलींना रात्रीच्या वेळी एकत्र ठेवण्याची कल्पना सुचली असावी. दुसरे कारण असे संभवते की, आदिवासी लोकांच्या झोपड्या फार लहान असतात. तिथेच एका बाजूला त्यांचे पाळीव प्राणी असतात. आईवडिल व लहान मुले एवढीच माणसे त्या झोपडीत कशीबशी झोपू शकतात. त्यामुळे मोठ्या मुलांचा प्रश्न निर्माण होतो. अशा स्थितीत त्यांची सोय करण्यासाठी सामुदायिक शयनगृहाची कल्पना निघाली असावी.

पूर्वोत्तर प्रदेशात आजही गोटुलाची प्रथा आहे. मध्यप्रदेशातील बस्तर नारायणपूर तहसिलमध्ये गोटुल आस्तित्वात आहे. परंतू सद्यस्थितीत तेही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आदिवासींची पूर्वापार चालत आलेली गोटूल परंपरा आज नामशेष होताना दिसते. कारण नागरी संस्कृतीचा परिणाम व शहरी लोकांशी वाढत चालेला सततचा संपर्क यामुळे आदिवासी संस्कृती परंपरांचे आस्तित्व धोक्यात येत आहे.

थोडक्यात 'गोटुल संस्था' ही त्या त्या जमातीची शिक्षण संस्थाच असते. यात जीवनाश्यक अशा सर्व गोष्टींचे शिक्षण, गोटुलात दिले जाते. शेतीची निरनिराळी कामे, शिकार, मध गोळा करणे इ.व्यावसायिक शिक्षण त्यांना गोटुलातच मिळते. तसेच जमातीची शिस्त, सामाजिक न्याय, परोपकार, पाप पुण्याच्या कल्पना, धार्मिक रितीरिवाज इ.गोष्टी ह्या निरनिराळ्या कथा, आख्यायिका व दंतकथा सांगून त्यांच्या मनावर बिंबविल्या जातात. ज्या पध्दतीने शहरात मूल सहा वर्षाचे झाले की त्याला शाळेत घालून संस्कारक्षम बनविण्यात येते. त्याचप्रमाणे गोटुल ही आदिवासी शाळाच असल्याचे यावरुन दिसून येते.

गोटुलांची संकल्पना ही जंगली श्वापदांपासून आणि इतर टोळ्यांपासून स्त्रियांचे व गुरांचे रक्षण करण्यासाठी निष्णात धनुर्धरांना व शिकाऱ्यांना एकत्र ठेवण्याची गरज त्या समाजात निर्माण झाली व पुढे त्यातूनच गांवातील सर्व तरुण-मुला-मुलींना रात्रीच्या वेळी एकत्र ठेवण्याची प्रथा सुरु झाली असावी. परंतु आता ही प्रथा हळूहळू सुधारणांमुळे नष्ट होऊ लागली आहे.

संदर्भ

१. *भारतीय संस्कृतीकोष*

२. *आदिवासींचे घोटुल*

३. *ट्राईब्ज अँड कास्ट ऑफ इंडिया*

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती : न्यायालयीन निकाल

* श्री.डी.आर.चौधरी

१) प्रशांत येवलेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर :-

श्री.प्रशांत येवलेकर यांनी हलबा अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी पुणे समितीस अर्ज केला होता. समितीने उमेदवाराचा दावा आईवडिलांचे कागदोपत्री पुराव्याआधारे अवैध ठरविला. उमेदवाराचे आई वडिलांचे शालेय रेकॉर्डला त्यांची जात कोष्टी असल्याचे आढळून आले होते.

मूळच्या विदर्भातील या विद्यार्थ्याने हलबा समाजाचे म्हणजेच अनुसूचित जमातीचे असल्याबाबत प्रमाणपत्र दिले होते. त्यानुसार उच्च न्यायालयाने त्याला व्ही.जे.टी.आय. मध्ये अनुसूचित जमातीच्या गटात तात्पुरता प्रवेश देऊन त्यांच्या जात पडताळणीचा प्रश्न या संदर्भातील सरकारच्या तपासणी समितीने आठ आठवड्यांमध्ये सोडवावा असा आदेश मागील वर्षी दिला होता.

त्यानुसार समितीच्या दक्षता पथकाने या विद्यार्थ्याच्या मूळ गावी जाऊन त्याच्या पूर्वजांच्या संदर्भातील काही कागदपत्रे तपासली. सुमारे १९५० च्या आधी त्याच्या आईकडील व वडिलांकडील नातलगांची जात कोष्टी दाखविण्यात आली होती असे पथकाला आढळून आले. मात्र आमच्या पूर्वजांचा परंपरागत व्यवसाय विणकामाचा होता. त्यामुळे तसेच त्यांच्या अज्ञानामुळे आमची जात कोष्टी दाखविण्यात आली असावी असा युक्तिवाद येवलेकर याने केला. मात्र तपासणी समितीने तो अमान्य करुन तो हलबा अनुसूचित जमातीचा नसल्याचा निर्णय दिला.

त्या निर्णयाविरुध्द प्रशांतने उच्च न्यायालयात अपील केले. आपल्या वंशावळीसंदर्भातील काही अत्यंत जुने उल्लेखही असल्याचा दावा त्याने ॲड. व्ही.झेड. कांकरिया यांच्यामार्फत केला. मात्र राज्य शासन व

*विधी अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

तपासणी समिती तर्फे बाजू मांडणाऱ्या वकीलांनी हा दावा फेटाळला. हलबा समाज अनुसूचित जमातीत मोडत असून कोष्टी समाज इतर मागासवर्गीयांपैकी आहे. याचिकेतील मुद्दा अत्यंत महत्वाचा असून अनुसूचित जमातींच्या गटात स्पर्धा कमी असल्याने इतर गटातील अनेक विद्यार्थी चुकीची व खोटी प्रमाणपत्रे घेऊन या गटात येतात व तेथील फायदे मिळवितात असा दावा त्यांनी केला. १९६१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसूचित जमातीची लोकसंख्या २३ लाख, तर इतर सर्व गटांची मिळून लोकसंख्या तीन कोटी होती. १९९१ च्या जनगणनेनुसार इतर गटाची लोकसंख्या दुपटीने (साडेसहाकोटी) वाढली तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या मात्र तिपटीने (६९ लाख) वाढली असे उदाहरणही त्यांनी दिले.

त्यामुळे अशा प्रकरणांवर निर्णय देताना १९५० पूर्वीच्या कागदपत्रांचा आधार घेण्यात यावा. त्यानंतरच्या कागदपत्रांमध्ये बदल होणे शक्य असल्याने ती अग्राह्य मानावीत. कारण अशा बाबतीत एकही निर्णय चुकीचा झाला, तर एका खऱ्याखुऱ्या अनुसूचित जमातीच्या तरुणावर अन्याय होईल, असा मुद्दाही ॲड. गांगल यांनी मांडला.

या प्रकरणातही हा विद्यार्थी कोष्टी समाजाचा असल्याची जुनी कागदपत्रे असल्याचे त्यांनी दाखवून देऊन अर्ज फेटाळण्याची मागणी केली. त्यानुसार ती याचिका न्यायालयाने फेटाळली.

२) रिट याचिका क्र.३५९१/९९ :-

उज्वलकुमार शंकरलाल वि. महाराष्ट्र शासन व इतर-

उज्वलकुमार शंकरलाल याने नाशिक तपासणी समितीकडे अनुसूचित जमातीचा राखीव उमेदवार म्हणून प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केले. उज्वलकुमार यास अनुसूचित जमातीचे राखीव जागेवर उच्च शिक्षण घेण्यासाठी तपासणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळण्याची आवश्यकता होती. तपासणी समितीने उमेदवाराचा दावा त्याने सादर केलेली कागदपत्रे तसेच पोलीस दक्षता पथकाने सादर केलेल्या चौकशी अहवालाचे आधारे तपासला. उमेदवाराचा दावा तपासणी समितीने अवैध ठरविला. उमेदवाराने सादर केलेले प्रमाणपत्र त्यांचे वडिल श्री.शंकरलाल यांनी कार्यकारी दंडाधिकारी, जळगांव यांची खोटी सही व शिक्क्याचा वापर करुन तयार केल्याचे समितीस आढळून आले. त्या आधारे

समितीने संबंधित कार्यकारी दंडाधिकाऱ्यास उमेदवाराचे वडिलांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या.

उमेदवाराने समितीच्या निर्णयाविरुध्द औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने उमेदवाराचे वकीलांचे म्हणणे की, तपासणी समितीने उमेदवाराची सर्व कागदपत्रे विचारात घेतली नाहीत हे मान्य केले नाही. उच्च न्ययालयाने तपासणी समितीचे बनावट प्रमाणपत्राबाबतचे मत ग्राह्य मानले व उमेदवाराचे अपील फेटाळले. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणात उमेदवारांचे वडिलांवर मोठी दंडनिय कारवाई करण्याचे विचाराधीन होते परंतु सदर प्रकरणी उमेदवाराचे वडिलांविरुध्द फौजदारी कारवाई चालू असल्याने न्यायालयाने सदर बाब बाजूस ठेवली.

*****

वृत्त विशेष :-

प्रशिक्षण विभाग

(सप्टेंबर १९९९ ते फेब्रुवारी २००० अखेर संपन्न झालेली प्रशिक्षण सत्रे)

संस्था दरवर्षी विविध प्रकारची प्रशिक्षणसत्रे आयोजित करते. या प्रशिक्षणसत्रांचे दोन मुख्य प्रकार आहेत. १) सेवापूर्व प्रशिक्षणसत्र, २) सेवांतर्गत प्रशिक्षणसत्र. सेवापूर्व प्रशिक्षण प्रकारामध्ये आदिवासी युवक व युवतींना वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. यात प्रामुख्याने स्पर्धा परिक्षांसाठी संस्था आदिवासी विद्यार्थ्यांची तयारी करून घेते. त्याचप्रमाणे सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये नोकरीसाठी मुलाखती कशा द्याव्यात, याची तयारी या विद्यार्थ्यांची या प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये घेण्यात येते.

सेवांतर्गत प्रशिक्षणात आदिवासी आश्रमशाळेतील प्राथमिक मुख्याध्यापक, माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक, गृहपाल, अधिक्षक व लिपिक यांच्याकरिता वेगवेगळया प्रकारची प्रशिक्षण सत्रे वर्षभर आयोजित केली जातात. आश्रमशाळेतील व्यवस्थापन, वेगवेगळया विषयांची सद्यस्थितीतील माहिती दुर्गम भागात असणाऱ्या शिक्षकांना होण्यासाठी अशा प्रशिक्षण सत्रांचा उपयोग होतो जेणेकरून हे शिक्षक आदिवासी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे माहिती पुरवून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यास मदत करू शकतील.

संस्थेने सप्टेंबर १९९९ ते फेब्रुवारी २००० अखेर खालीलप्रमाणे प्रशिक्षण सत्रे आयोजित केली होती व त्याचा खालील लाभार्थींनी लाभ घेतला आहे.

सेवापूर्व प्रशिक्षण सत्र

अ.क्र	प्रशिक्षणाचा कालावधी	मुले	मुली	एकूण
१.	२९.११.१९९९ ते १०.१२.१९९९	४०	५	४५
२	१३.१२.१९९९ ते २४.१२.१९९९	२०	२	२२
३.	१०.१.२००० ते २१.१.२०००	४५	१५	६०
४.	१२.२.२००० ते २२.६.२०००	६०	१	६१
	एकूण			१८८

सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी सप्टेंबर १९९९ ते फेब्रुवारी २००० अखेर आश्रमशाळांमधील इंग्रजी, मराठी,इतिहास, सांस्कृतिक शिक्षक व अर्हताकारी व सेवाप्रवेशोत्तर परीक्षेस बसलेले वरिष्ठ/कनिष्ठ लिपीक/मुख्य लिपीक/उपलेखापाल अशा एकूण ५३३५ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात आला आहे.

संस्था भेटी

सन्माननीय ब्रिटीश हाय कमिशनर, नवी दिल्ली यांच्या मिसेस 'लेडी कॅथरीन यंग' ह्यांनी दिनांक ३०.११.९९ रोजी संस्थेस व संग्रहालयास सदिच्छा भेट दिली.

दिनांक २.२.२००० रोजी मा.ना.श्री.प्रकाशजी आवाडे, आदिवासी राज्यमंत्री महोदयांनी संस्थेस व संग्रहालयास भेट दिली व संस्थेच्या कामाचा आढावा घेतला.

आदिवासी हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन

आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या वस्तूंना शहरांत बाजारपेठ मिळावी यासाठी या संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आदिवासी हस्तकला प्रदर्शन व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे उद्घाटन दैनिक सकाळचे वृत्तसंपादक श्री.सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते दिनांक २४.२.२००० रोजी सकाळी १०.३० वाजता केले.

या प्रदर्शनासाठी पुणे, रायगड, गोंदिया, चंद्रपूर, ठाणे, भंडारा आदि भागातील आदिवासी कारागिरांच्या हस्तकलेच्या विविध वस्तु विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यात बांबूकाम, वेतकाम, विविध प्रकारचे मुखवटे, काष्ठशिल्पे, दगडी शिल्पे, खेळणी, दागदागिने, वनौषधी, जडीबुटी यांचा विक्री साहित्यात समावेश होता. हे प्रदर्शन दि.२४ ते २८ फेब्रुवारी, २००० पर्यंत खुले होते.

या प्रदर्शनासाठी पुण्याचे विभागीय आयुक्त श्री.राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी श्री.विजयकुमार गौतम, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री.अरविंद सिंह आणि प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक श्री.डी.एस.कुलकर्णी उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रदर्शनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. या प्रदर्शनात अंदाजे एकूण रु.२.५ लाख इतक्या किंमतीच्या वस्तुंची विक्री झाली.

तसेच अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेसाठी श्री.आर.के.मुटाटकर यांनी मार्गदर्शन करुन उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या शंकाचे निरसन केले. श्री.आर.डी.खरोसेकर, संचालक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

*****

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

सन्माननीय ब्रिटीश हायकमीशनर, नवी दिल्ली यांच्या मिसेस 'लेडी कॅथरीन' ह्यांनी संस्थेस व संग्रहालयास भेट दिली. या प्रसंगी संस्थेचे संचालक, मा. श्री. आर. डी. खरोसेकर यांनी त्यांना 'वारली पेंटींग' भेट देताना.



आदिवासी राज्यमंत्री, मा. ना. श्री. प्रकाशजी आवाडे यांनी संस्थेस दि. २/२/२००० रोजी भेट दिली. त्यावेळी संग्रहालयाची पाहणी करताना मा. श्री प्रकाशजी आवाडे.

मा. ना. श्री. प्रकाशजी आवाडे, आदिवासी राज्यमंत्री, यांनी संस्थेस भेट दिली असताना संस्थेच्या कामासंबंधीची माहिती देताना संस्थेचे संचालक मा. श्री. आर. डी. खरोसेकर व इतर अधिकारी वर्ग.

TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune - 411 001.

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

Guidelines for Contributors :

The manuscripts to be published in this Bulletin should be type written in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organised under suitable headings. Tables should be preferrably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the editor is not responsible for the views expressed by the authors.

Apart from the honorarium, the contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondence should be addressed to the *Director, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune 411 001.*

Registration No.RN-37/438/79

FORM IV

(See Rule 80)

1. Place of Publication	: 28, Queen's Garden Pune 411 001.
2. Periodicity of Publication	: Bi-annual
3. Printer's Name	: Manager Photozinco Press, Pune 411 001.
Nationality	: Indian
Address	: Photozinco Press, Pune 411 001.
4. Publisher's Name	:Shri R.D.Kharosekar I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.
5. Editor's Name	: Shri R.D.Kharosekar I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.

I, R.D.Kharosekar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

R.D.Kharosekar
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs. 50/-

PRINTED AT GOVT. PHOTOZINCO PRESS, PUNE.